## नेमणे आहे
नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०१ | शनिवार, दि. ३१ मे २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

## संमिश्र

### पंजाबमध्ये फटाका कारखान्यात स्फोट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुक्तसर** :पंजाबमधील मुक्तसर येथे एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. ४ कामगारांचा मृत्यू झाला, एकाची प्रकृती गंभीर आहे. ढिगाऱ्याखालून ३३ जणांना वाचवण्यात यश आले आहे. बचाव आणि मदत कार्य सुरू आहे. जखमींना भटिंडा एम्समध्ये पाठवण्यात आले आहे. कारखान्यात एकूण ४० लोक काम करत होते.

### ... अखेर नीलेश चव्हाणला बेड्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात प्रमुख आरोपींमध्ये समावेश असल्याचा आरोप केला जाणारा नीलेश चव्हाण याला पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. नीलेश गेल्या काही दिवसांपासून फरार होता. मात्र आता त्याला नेपाळमधून पोलिसांनी अटक केली आहे. नीलेश चव्हाण याच्यावर बाळाची हेळसांड केल्याचा तसेच कस्पटे कुटुंबावर बंदूक रोखण्याचा देखील आरोप आहे. नीलेश चव्हाण याच्या अटकेनंतर आता या प्रकरणात अनेक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. चव्हाण या तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# ‘प्राण जाए पर वचन ना जाए’

## पंतप्रधान मोदी; बिहारमधील सासारामच्या दुर्गाडीह येथे सभा

जनता आवाज वृत्तसेवा

**सासाराम : पंतप्रधान मोदी बिहारमधील सासाराम येथील दुर्गाडीह येथे एका जाहीर सभेला संबोधित करत आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले की, सासाराम च्या नावात राम आहे. येथील लोकांना माहित आहे की भगवान राम आणि त्यांच्या वंशाची प्रथा काय होती. प्राण जाए पर वचन ना जाए म्हणजे एकदा दिलेले वचन नेहमीच पूर्ण होते.**



प्रभु श्री रामाची ही प्रथा भारताचे धोरण बनली आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात निष्पाप लोक मारले गेले. या हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी मी बिहारला आलो. मी बिहारच्या भूमीवरून देशाला वचन दिले होते. दहशतवाद्यांच्या मालकांचे अड्डे जमीनदोस्त केले जातील.

बिहारच्या भूमीवर, मी म्हटले होते की त्यांना कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल. आज जेव्हा मी बिहारमध्ये आलो आहे, तेव्हा मी माझे वचन पूर्ण करून आलो आहे. ज्यांनी पाकिस्तानात बसून आमच्या बहिणींचे सिंदूर नष्ट केले होते. आमच्या सैन्याने त्यांचे अड्डे उध्वस्त केले. पाकिस्तान आणि जगाने भारताच्या मुलींच्या सिंदूरची शक्ती देखील पाहिली.

शत्रूला हे माहित असले पाहिजे की ऑपरेशन सिंदूर हा आपल्या भात्यातील फक्त एक बाण आहे. भारताचा लढा थांबलेला नाही आणि थांबलेला नाही. जर दहशतीचा कणा पुन्हा उभा राहिला तर आम्ही त्याला त्याच्या बिळातून बाहेर काढू आणि चिरडून टाकू. मग ते सीमेपलीकडे असो किंवा सीमेच्या आत.

उद्घाटन आणि पायाभरणीनंतर, पंतप्रधान मोदी सार्वजनिक सभेला उपस्थित राहतील. यासाठी बिक्रमगंजच्या दुर्गाडीहमध्ये १२ लाख चौरस फूट जागेचा पंडाल बांधण्यात आला आहे.

पंडालमध्ये सुमारे ४ लाख लोक बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. या जाहीर सभेत ६ लाखांहून अधिक लोकांची गर्दी असेल, असा दावा पक्षाकडून केला जात आहे.

### मखाना बोर्डाची घोषणा

आमचे सरकार बिहार मधील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सतत काम करत आहे. आमच्या सरकारने मखाना बोर्डाची घोषणा केली आणि जीआय टॅग दिला. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी वाढेल. १४ पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

### पंतप्रधानांनी काँग्रेस आणि राजदवर निशाणा साधला

बिहारमध्ये सर्वात जास्त फसवणूक झाली. ज्यांच्या राजवटीत बहुतेक लोक राज्य सोडून गेले. तेच लोक सामाजिक न्याय देण्याचा आव आणत आहेत. दलित आणि मागासवर्गीय लोक, ज्यांच्याकडे कायमचे घर नव्हते. गरिबांना असहाय्यपणे जगण्यास भाग पाडले जात होते. दुसरीकडे, काँग्रेस आणि राजदचे लोक सामाजिक न्यायाबद्दल बोलतात.

### पंतप्रधान मोदींनी लालूंवर निशाणा साधला

बिहारमध्ये जागतिक दर्जाच्या गाड्या धावत आहेत. रेल्वेचेही आधुनिकीकरण केले जात आहे. हे आधीच करता आले असते, परंतु यासाठी जबाबदार असलेल्यांनी नोकरीच्या नावाखाली गरिबांच्या जमिनी लुटल्या. सामाजिक न्यायाच्या या त्यांच्या पद्धती होत्या. गरिबांना लुटत होते आणि स्वतः राजेशाही जीवनाचा आनंद घेत होते. भविष्यातही जंगलराजच्या पद्धतींबद्दल तुम्ही सावधगिरी बाळगली पाहिजे.

# खा. लंकेंचा आपत्तीग्रस्तांना दिलासा

## आपत्तीग्रस्तांना किराणा, चाऱ्याची केली मदत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यात अतिवृष्टीमुळे अकोळनेर, वाळकी, खडकी, सारोळा कासार, भोरवाडी येथे मोठे नुकसान झाले असून खा. नीलेश लंके यांनी या गावांना भेटी देत गरजूंना किराणा साहित्य तसेच जनावरांसाठी चाऱ्याची मदत करत कृतीतून दिलासा दिला.

दरम्यान, झालेल्या नुकसानीची आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत मिळावी, अशी मागणी स्थानिक प्रशासनाकडे केली.

खा. लंके यांच्या या दौऱ्यात बाळासाहेब हराळ, योगीराज गाडे, राजू भगर, नितीन पवार, वसंत गरूड, अरूण जाधव, सचिन शिंदे, बहू गहिले, सुहास कासार, संदीप बोठे, दिलीप भालसिंग, सागर कासार, ज्ञानेश्वर लंके यांचा समावेश होता. खा. लंकेंच्या पान ४

वाळकी येथे गंगाराम जुंदरे व परसराम जुंदरे यांच्या २५ गायी, ४० शेळया वाहून गेल्या. या वस्तीवरील पुलही वाहून गेला. फळबागा तसेच चाराही वाहून गेल्याने या कुटूंबावर मोठी आपत्ती कोसळली. खा. लंके यांनी जुंदरे वस्तीवर जात वस्तीवरील बंधाऱ्याचे दरवाजे उघडून पाणी सोडून दिले. तसेच चारा व किराणा मालाची व्यवस्था करून या परिवाराला दिलासा दिला.

# उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करा

## माजी कृषिमंत्री थोरात; थोरात कारखान्याच्या वतीने ऊस विकास मेळावा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : ऊस व दूध हे शेतकऱ्यांसाठी शाश्वत पीक आहे. शेतीमध्ये ठिंबक सिंचनासह नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. सातत्याने वापर होत असलेल्या शेतीमध्ये सेंद्रिय द्रव्यांची कम तरता झाली असून ती भरून काढण्याबरोबर कमी पाणी व कमी श्रमामध्ये एकरी १०० टना पेक्षा जास्त उत्पादन होणे गरजेचे असून यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

वाघापूर येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून ऊस विशेषज्ञ सुरेश माने हे होते. तर व्यासपीठावर व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, ॲड. नानासाहेब शिंदे, संपतराव गोडगे, विनोद हासे, नवनाथ आरगडे, सतीश वर्पे, डॉ. तुषार दिघे, रामदास धुळगंड, गुलाबराव देशमुख, अरुण वाकचौरे, अंकुश ताजने, रामनाथ कुटे, योगेश भालेराव, दिलीप नागरे, विलास शिंदे, ॲड. बाबासाहेब पान ४

> ऊस शेती ही निष्काळजीपणे न करता अधिक काळजीपूर्वक केल्याने नक्कीच एकरी उत्पादन वाढेल, असा विश्वास व्यक्त करताना थोरात कारखान्यावर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी व बाहेरील उत्पादक यांचाही मोठा विश्वास असल्याने कारखान्याचे सातत्याने गाळप चांगले होत असते. कार्यक्षेत्रात जास्त ऊस उत्पादन झाल्याने उपपदार्थांची निर्मिती जास्त होऊन त्याचा नक्कीच शेतकऱ्यांना फायदा होईल.
>
> **- बाळासाहेब थोरात, माजी कृषिमंत्री**

# अण्णा हजारेंच्या जन्मदिनानिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार सोहळा

जनता आवाज वृत्तसेवा

**पारनेर : ज्येष्ठ समाजसेवक पद्मविभूषण अण्णा हजारे यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील विविध विकास कामांचा शुभारंभ तसेच अण्णा हजारे यांच्या नावाने सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ति आणि संस्थाना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचा वितरण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत राळेगण येथे वरिष्ठ अधिकारी आणि प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. बैठकीत कार्यक्रमाची रूपरेषा, ठिकाण आणि अन्य नियोजनाबाबत विभगाच्या अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

या बैठकीला समाजसेवक अण्णा हजारे, आ. काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते. राळेगण प्राथमिक आरोग्य केंद्र, सौर उर्जा प्रकल्प, कृष्णा पाणी पुरवठा योजना, जलजीवन योजना, जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्या आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या वाढदिवसानिमिताने स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या अण्णा हजारे सामाजिक गौरव पुरस्काराने सामाजिक संस्था आणि पान ४



> पद्मविभूषण अण्णा हजारे हे आपल्या जिल्ह्याचे भूषण आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी निमंत्रित करण्यात आले आहे. अण्णांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणारा सत्कार सोहळा आणि विविध विकास कामाचा शुभारंभ जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या दृष्टीने अभिमानाचा क्षण असेल.
>
> **- राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

## लग्न बनले अग्निपरीक्षा

# नवरी मिळेना नवऱ्याला

- **तरुणांची वाटचाल चाळीशी-पन्नाशीकडे**
- **मुलींसह पालकांच्याही अपेक्षा वाढल्या**
- **लग्न जुळवताना नातेवाईकांची दमछाक**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : आज-काल लग्न जुळवताना नातेवाईकांची चांगलीच दमछाक होत असून लग्नाची सुपारी फोडण्याचे भाग्य अजून काही तरुणांना मिळालेले नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा करून सुद्धा विवाह जुळत नसल्याने हतबल झालेल्या अनेक तरुणांची वाटचाल वयाच्या चाळीशी पन्नाशीकडे सुरू आहे. त्यात ग्रामीण भागातील व शेतकरी मुलगा नको ग बाई, अशी इच्छा मुलीकडून येत असल्यामुळे ग्रामीण भागातील मुलांचे लग्न जुळवणे हा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

लग्नाचे वय पार करूनही लग्न जुळत नसल्यामुळे अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जाताना दिसत आहे. त्यामुळे पालकांच्या चिंता आणखीनच वाढल्या आहेत. थोरला भाऊ विना लग्नाचा असताना धाकट्याचे ही वय झाल्याने तो देखील गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहे. मात्र, बायोडाटा फिरवूनही योग जुळून येत नसल्याने लग्न करणे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

लग्नकार्यासाठी लागणारा सर्व खर्च करतो पण मुलगी द्या. अशी मनधरणी करून देखील लग्न जुळणे अवघड झाले आहे.

वधू-वर सूचक मंडळाकडूनही प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे लग्न जुळवावे म्हणून वधू-वर सूचक मंडळात नाव नोंदवून झाले तरीही रिप्लाय येत नाही. नातेवाईकांमार्फत मुलगी शोधण्यासाठी प्रयत्न केले. लांबच्या नातेवाईकांची मुलगी आहे का? हे पाहून झाले तरी मनासारखी मुलगी मिळत नसल्याने नवरा मुलगा चिंतेत आहे.



मुलींच्या अपेक्षा आणि मुलींच्या घरच्या मंडळींच्या अपेक्षा वाढल्यामुळे चांगले शिक्षण व नोकरी असणाऱ्या मुलांच्या ही लग्नाचा प्रश्न गंभीर झाला आहे. माझ्या मुलीला आता चांगले स्थळ आले आहे. त्यापेक्षा आणखी चांगले स्थळ मिळेल पान ४



जी.एस. साहेबांचा मान, करा रिक्षाला मतदान!!
पॅनल प्रमुख
श्रीमती सुमन गुलाबराव शेळके
मा.अध्यक्ष - जी. एस. महानगर बँक

संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके पॅनल
जीएस महानगर को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड | पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणूक २०२५ - २०३०

उमेदवार यादी

सर्वसाधारण गट (OPEN)

| अ. क्र. | उमेदवार | चिन्ह | अ. क्र. | उमेदवार | चिन्ह |
|---|---|---|---|---|---|
| २ | भगत विष्णू सखाराम<br>मा. अध्यक्ष सेनापती बापट पतसंस्था | | १९ | लावंड शिवाजी सदाशिव<br>व्यावसायिक | |
| ३ | भोसले किशनराव शंकरराव<br>मा. कार्यकारी संचालक जी. एस. महानगर बकँ | | २१ | CA पाटील योगेश पांडुरंग<br>मा. अध्यक्ष BOM जी. एस. महानगर बकँ | |
| ४ | चत्तर विजय नानाभाऊ<br>व्यावसायिक निर्यात/आयात/वाहतूक | | २२ | राऊत अर्जुन किसन<br>मा. सचिव सेनापती बापट पतसंस्था | |
| ५ | डॉ. डेरे गीतांजली राजेश<br>मा. संचालिका जी. एस. महानगर बँक | | २४ | शेळके स्मिता गुलाबराव<br>मा. संचालिका जी. एस. महानगर बँक | |
| ६ | डॉ. डेरे राजेश चंद्रकांत<br>MBBS, MD, LLB, MBA | | २७ | तांबे नंदकुमार नाथा<br>अध्यक्ष बर्वेनगर व्यापारी मंडळ | |
| ८ | ढोमे सुरेश होणाजी<br>मा. संचालक जी. एस. महानगर बँक | | ३० | वरखडे बबुशा बाबुराव<br>माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर | |
| १० | हाडवळे भानुदास ज्ञानदेव<br>व्यावसायिक: ए.बी. ग्लोबल | | | | |

महिला राखीव गट

| अ. क्र. | उमेदवार | चिन्ह |
|---|---|---|
| ३ | शेळके स्मिता गुलाबराव<br>मा. संचालिका जी. एस. महानगर बँक | |
| ४ | शेळके सुमन गुलाबराव<br>मा. अध्यक्ष जी एस. महानगर बँक | |

इतर मागासवर्गीय गट (OBC)

| अ. क्र. | उमेदवार | चिन्ह |
|---|---|---|
| २ | कुऱ्हे मंगेश ज्ञानेश्वर<br>व्यावसायिक | |

भटक्या विमुक्त जाती गट (NT)

| अ. क्र. | उमेदवार | चिन्ह |
|---|---|---|
| १ | गर्जे प्रविण कारभारी<br>व्यावसायिक व समाजसेवक | |

चिन्ह


जी.एस. साहेबांचा मान, करा रिक्षाला मतदान!!
मतदान दिनांक आणि वेळ:
रविवार, १ जून २०२५, सकाळी ८ ते सायंकाळी ५

# तिसगावमध्ये गोरक्षकावर हल्ला

## हात-पाय बांधून सोन्याची चैन, पैसे लुटले; नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे गोरक्षक भारत लिपारे (वय ३९) यांच्यावर ९ जणांच्या टोळक्याने हल्ला करून मारहाण केल्याची धक्कादायक घटना २९ मे रोजी दुपारी घडली.

या हल्ल्यात लिपारे यांची दीड तोळ्याची सोन्याची चैन आणि आठ हजार पाचशे रुपयांची रोख रक्कम लुटण्यात आली. तसेच, हल्लेखोरांनी लिपारे यांचे हात-पाय बांधून त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन तलवारीसह लाकडी दांडके, बेल्ट, फायटरणे मारहाण केली.

या प्रकरणी पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. लिपारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते आपल्या आईला दवाखान्यातून घरी आणत असताना त्यांना गोरक्षक मित्राकडून कत्तलीसाठी गाय व वासरू नेणाऱ्या पिकअपची माहिती मिळाली. यानंतर तिसगाव येथील वृद्धेश्वर हायस्कूल चौकात ते थांबले असता, दोन इसमांनी त्यांची कॉलर पकडून त्यांना रविवार पेठेतील एका नवीन बांधकामाच्या ठिकाणी नेले आणि मारहाण सुरू केली. नंतर त्यांना एका घरात डांबून ठेवले.

यावेळी हल्लेखोरांनी लिपारे यांचा मोबाइल हिसकावून त्यांच्या पँटवर पाणी टाकले आणि खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली. तलवारीने हल्ला करून आणि मॉब लिंचिंगची धमकी देऊन त्यांना जीवघेणी भीती दाखवली. लिपारे यांनी मित्राला फोनवरून माहिती दिल्याने पोलिसांना याची खबर मिळाली. पोलीस गाडी घटनास्थळी पोहोचताच हल्लेखोर पळून गेले. पोलिसांनी लिपारे यांना तातडीने सरकारी रुग्णालयात दाखल करून प्राथमिक उपचार केले. लिपारे यांचे मित्र यांनी दाखवलेल्या फोटोंवरून हल्लेखोरांची ओळख पटली.

यामध्ये शाकीर कुरेशी, इरफान कुरेशी, इरशाद कुरेशी, अरबाज राजू पठाण, अफजल हनिफ कुरेशी, जुनेद शेख, बबलू जब्बार कुरेशी, सलीम माजीद कुरेशी आणि रफीक कुरेशी (सर्व रा. तिसगाव) यांचा समावेश आहे. पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. ही घटना परिसरात तणाव निर्माण करणारी ठरली असून, गोरक्षकांवरील हल्ल्यामुळे स्थानिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# शहीद गायकरांच्या बलिदानाचा जिल्ह्याला अभिमान राहिल

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून गायकर कुटुंबियांचे सांत्वन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** जम्मू काश्मीर मध्ये दहशतवाद्यांशी लढताना वीरमरण आलेले अकोले तालुक्याचे सुपुत्र शहीद जवान संदीप पांडुरंग गायकर यांच्या कुटुंबीयांचे काल महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांत्वन केले आहे. याचबरोबर या सुपुत्राचा संपूर्ण महाराष्ट्राला सदैव अभिमान राहील, असे अभिवादन केले आहे.

ब्राह्मणवाडा येथे शहीद संदीप गायकर यांच्या कुटुंबीयांची मा. महसूल मंत्री



बाळासाहेब थोरात यांनी भेट घेतली. याप्रसंगी वीर पत्नी रूपाली गायकर, वीर जवान संदीप यांचे वडील पांडुरंग गायकर याचबरोबर विक्रम नवले, सुरेश गडाख, ड. आर. बी. हांडे, शिवाजी नेहे, सुभाष गायकर,भारत आरोटे, संदीप वाघमारे, रजनीकांत भांगरे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

जम्मू काश्मीरमधील तिसवाड सेक्टरमध्ये दहशतवाद्यांशी लढताना १५ मराठा बटालियन

> शहीद गायकर यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. याचबरोबर या सुपुत्राने देशासाठी बलिदान दिले असून अहिल्यानगर जिल्हा, संगमनेर तालुका व अकोले तालुका हा सदैव या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहील. तसेच वीर जवान संदीप याचा आपल्याला सदैव अभिमान राहील.
>
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

मध्ये कार्यरत असलेले अकोले तालुक्याचे सुपुत्र संदीप जवान यांना हुतात्म प्राप्त झाले. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठी शोककळा पसरली. हे वृत्त समजतात मा. महसूल मंत्री थोरात यांनी शोक व्यक्त करत देशाच्या सीमांचे रक्षण करण्याकरता आपल्या सुपुत्राने बलिदान दिले असल्याने त्याची बलिदान हे व्यर्थ जाणार नसून या त्यांच्या बलिदानाचा संपूर्ण जिल्ह्याला अभिमान राहील, असे गौरवोउद्गार काढले होते.

यावेळी गावातील पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'तक्षशिला'मध्ये अकरावी प्रवेशाबाबत मदत केंद्र सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून महाराष्ट्र शासनाने इयत्ता अकरावीचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने करावयाचे ठरवले आहे. हे प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येत आहेत. ऑनलाईन फॉर्म कसा भरावा? विद्यालयाचा प्राधान्यक्रम कसा निवडाढवा? त्यासाठी कोणती कागदपत्रे जोडावित ? फॉर्मचे शुल्क किती भरावे ? असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांसमोर आहेत.

विद्यार्थ्यांनी येताना सोबत इयत्ता दहावीचा शाळा सोडलेला दाखला, दहावीचे मार्कशीट, आधार कार्ड व इतर आवश्यक कागदपत्रे घेवून यावीत. विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत व मार्गदर्शन केले जाईल. तक्षशिला ज्युनिअर कॉलेजमध्ये मेडिकलला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी क्रॉप सायन्स हा २०० मार्कांचा विशेष विषय असून इंजिनिअरींगला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आय टी) हा विषय उपलब्ध आहे. तरी या सर्व सुविधांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शाळा व्यवस्थापनाने केले आहे.

> अकरावीच्या विद्यार्थ्यांनी या गोंधळातून मार्ग काढण्यासाठी नेवासा तालुक्यातील देडगाव येथील तक्षशिला ज्युनिअर महाविद्यालयात ऑनलाइन मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी तक्षशिला ज्युनिअर कॉलेजमध्ये येथे संपर्क साधावा, अशी माहिती प्राचार्य विठ्ठल कदम व उपप्राचार्य संदीप खाटीक यांनी दिली आहे.

# पाराजी कोकाटे यांचे वृद्धापकाळाने निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** चिचोंडी पाटील येथीलरहिवासी पाराजी रामभाऊ कोकोटे (वय १०६) यांचे ३० मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ मुली, २ नातू, नातसुना असा परिवार आहे.

# होळकर त्रिशताब्दी महोत्सव महाआरतीने साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने श्रीरामपूर तालुका व शहर भारतीय जनता पार्टी मंडळाच्यावतीने भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विविध स्तरांतील पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते तसेच शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, जितेंद्र छाजेड, संजय फंड, गौतम उपाध्ये, बंडूकुमार शिंदे, मारुती बिंगले, सतीश सौदागर, रामभाऊ तरस, डॉ. मनोज छाजेड, आनंद बुधेकर, श्रीनिवास बिहानी, अक्षय गाडेकर, किरण कर्नावट, श्रेयश झिंरगे, अशीश धनवटे, विशाल अंभोरे, विठ्ठल राऊत, विजय आखाडे, रवी पंडित, योगेश ओझा, प्रतीक वैद्य, श्रेयस सुवर्णपाटकी, रुपेश हरकल आदींसह भाजपचे कार्यकर्ते सहभागी झाले.

> अहिल्यादेवींनी आपल्या जीवनात समाजासाठी समर्पित भावनेने काम केले. त्यांच्या त्याग, प्रेम व कर्तृत्वाचा इतिहास आजही समाजाला प्रेरणा देतो. काशी विश्वेश्वर मंदिराच्या पुनर्रचनेपासून ते उज्जैन महाकाल मंदिराचा विकास हे त्यांचे कार्य केवळ ऐतिहासिकच नाही तर आध्यात्मिकदृष्ट्याही महत्त्वपूर्ण आहे. आजच्या काळात अशा स्त्रीशक्तीचा आदर्श समाजासमोर ठेवावा लागेल.
>
> **– नितीन दिनकर, जिल्हाध्यक्ष**

बाबासाहेब चिडे यांनीही या प्रसंगी अहिल्यादेवी होळकर यांच्या योगदानाचा इतिहास उपस्थितांना सांगितला आणि महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. जितेंद्र छाजेड यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत केले, तर बंडूकुमार शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.या महाआरती कार्यक्रमामुळे अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यास मदत झाली. भारतीय संस्कृतीतील स्त्रीशक्तीचा आदर्श असलेल्या या महान राणीच्या स्मृती जपण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन होणे गरजेचे असल्याचे मतही अनेक मान्यवरांनी व्यक्त केले.ही महाआरती म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे, तर सामाजिक जागृती आणि ऐतिहासिक वारशाचे स्मरण करणारा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# 'गृहविज्ञान महिला महाविद्यालय-करियर कट्टा'त करार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालय आणि राज्य सरकारचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कोल्हापूर येथील माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राशी सामंजस्य करार करण्यात आला, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनुश्री खैरे यांनी दिली. या करारावर प्राचार्य आणि महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महारष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करीयर कट्टा या उपक्रमअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर विविध कार्यक्रम राबवले जातात. या उपक्रमाचा विस्तार आणि अंमल बजावणी आधिक प्रभावी होण्यासाठी पुणे विभागातील करीयर कट्टा संलग्न महाविद्यालयांची सहविचार सभा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आण्णासाहेब मगर महविद्यालय, हडपसर येथील का र्यक्रमात हा करार झाला.

यूजीसी एमएमटीटीसीचे संचालक डॉ. संतोष केंद्रे यांच्या हस्ते या सभेचे उद्घाटन झाले. यावेळी विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ. नितीन घोरपडे, अहील्यानानगरचे प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, जिल्हा समन्वयक डॉ. नवनाथ नागरे आदी उपस्थित होते. विद्यार्थी केंद्रित उपक्रमांना गती देण्याच्या या प्रयत्नांबद्दल संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील आणि शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे यांनी अभिनंदन केले.

# प्रा. जवाहर मुथांना जर्नालिस्ट कौन्सिल ऑफ इंडियाचा पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** ३० मे हा दिवस हिंदी पत्रकार दिन म्हणून भारतात ओळखला जातो. जर्नलिस्ट कौन्सिल ऑफ इंडिया (नोंदणीकृत) या अखिल भारतीय पत्रकार परिषदेने प्रा. जवाहर मुथा यांना या वर्षी डिजिटल प्रम



ाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. प्रा.मुथा यांनी महाराष्ट्र हिंदी पत्रकार संघटना १९९५ मध्ये स्थापन केली होती.

त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दहा वर्षे कार्य केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठात ते संशोधन संपादक होते. कृषी पत्रकारितेचा अभ्यासक्रम त्यांनी आपल्या सेवेच्या काळात सुरू केला होता. किर्लोस्कर मासिकांचे ते सहसंपादक होते. इल्नाचे (इंडियन लॅग्वेजेस न्यूज पेपर्स असोसिएशन) जनरल सेक्रेटरी ते होते. त्याशिवाय ज्योतिष पत्रिका, साप्ताहिक नगर संकेत, मिलिंद, या वृत्तपत्रांना स्थापन करून त्यांनी मार्गदर्शन केले आहे. आज ही वयाच्या ८५ व्या वयात ते लेखन कार्य करीत असतात. पुणे विद्यापीठात त्यांच्या पत्रकारिता व साहित्यविषयक कार्यावर संशोधन ही झाले आहे. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीने त्यांना बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार देऊन गौरवले आहे. जर्नालिस्ट कौंसिल ऑफ इंडिया या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनुराग सक्सेना यांनी ३० मे रोजी हिंदी पत्रकारिता दिनानिमित्त प्रा. जवाहर मुथा यांना डिजिटल प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

# ...अन्यथा जेलभरो आंदोलन छेडणार

## शिवाजीराव ढवळे यांचा इशारा; राहुरी फॅक्टरी येथे रास्तारोको

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी फॅक्टरी :** देवळाली प्रवरा येथील आदिवासी कुटुंबावर झालेल्या अन्याय-अत्याचार विरोधातील आरोपी राजरोजपणे गावात फिरत असून त्यांना पोलीस प्रशासनाने अद्याप अटक केलेली नाही. पोलीस प्रशासन त्यांना पाठीशी घालत असल्यास आरोपींना सहकार्य केल्याबद्दल पोलिसांवर देखील गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करू. येत्या दोन दिवसात आरोपींना अटक केली नाही, तर जिल्हाभर जेलभरो आंदोलन छेडू, असा इशारा एकलव्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव ढवळे यांनी दिला आहे. एकलव्य संघटनेच्या वतीने राहुरी फॅक्टरी येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते

शिवाजीराव ढवळे म्हणाले की, आदिवासी कुटुंबीयांच्या महिलांवर रात्री-अपरात्री येऊन आरोपींनी हल्ला केला आहे. आरोपी दोन महिने झाले तरी अजून अटक नाही, संबंधित कुटुंब उपोषणास बसले आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात आरोपींना अटक केली नाही, तर एकलव्य संघटनेच्यावतीने जिल्हाभर जेलभरो आंदोलन छेडून आरोपींना सहकार्य केल्याबद्दल पोलिसांवर देखील गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करू, असा इशारा ढवळे यांनी दिला आहे.या रास्तारोकोचे निवेदन श्रीरामपूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व नायब तहसीलदार संध्या दळवी यांना देण्यात आले.



यावेळी एकलव्य संघटनेचे जयेश माळी, सामाजिक कार्यकर्ते कुमार भिंगारे, गीताराम बर्डे, नाना बर्डे, विशाल बर्डे, जनता ग्रुपचे प्रमोद बर्डे, राजेंद्र भालेराव, रवींद्र बर्डे, राहुल बर्डे, अमीन पठाण आदिंसह एकलव्य संघटना, आदिवासी समाज बांधव उपस्थित होता.रास्ता रोको आंदोलनामुळे नगर-मनमाड मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. आंदोलन संपल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत सुरू झाली.

# तीन महिन्यांचे अन्नधान्य आगाऊ वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या प्रतिकूल हवामानामुळे अन्नधान्य वितरणात अडथळा येऊ नये, म्हणून केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत ऑगस्ट २०२५ पर्यंतच्या अन्नधान्याचे आगाऊ वितरण करण्यास मंजुरी दिली आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यात ३० मे २०२५ पर्यंत धान्याची उचल पूर्ण करणे आणि ३० जून २०२५ पर्यंत वाटप पूर्ण करणे आवश्यक आहे. जून, जुलै आणि ऑगस्ट २०२५ या तीन महिन्यांचे अन्नधान्य लाभार्थ्यांना एकत्रितपणे मिळणार असुन लाभार्थ्यांनी वेळेत अन्नधान्य उपलब्ध करुन घेण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.रास्तभाव दुकानदारांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत दुकान उघडे ठेवावे आणि दुकानाच्या दर्शनी भागात या तीन महिन्यांच्या अन्नधान्य वाटपाबाबतचा फलक लावावा. अन्नधान्याचे वितरण ई-पॉस मशिनद्वारेच करण्यात येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्यासाठी स्वतंत्र बायोमेट्रिक (अंगठा) प्रमाणीकरण करणे आवश्यक असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# शिर्डीत आजपासून राज्यस्तरीय पत्रकार कार्यशाळा

## व्हॉइस ऑफ मीडिया महिला विंगचा उपक्रम; दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** व्हॉइस ऑफ मीडिया महिला विंगच्या वतीने येथील आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूलमध्ये आज, दि. ३१ मे आणि दि.१ जून असे दोन दिवसीय राज्यस्तरीय पत्रकार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती व्हॉइस ऑफ मीडिया महिला विंगच्या प्रदेशाध्यक्षा रश्मी मारवाडी आणि अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने यांनी दिली.

या राज्यस्तरीय पत्रकार कार्यशाळेचे उद्घाटन जंगलीदास महाराज आश्रमाचे मठाधिपती प पू परमानंद महाराज यांच्या हस्ते होणार असून यावेळी खा. भाऊसाहेब वाकचौरे, संगमनेरचे आ. अमोल खताळ, माजी आ. स्नेहलता कोल्हे, संजीवनी उद्योग समूहाचे बिपिन कोल्हे, मालपाणी उद्योग समूहाचे संचालक गिरीष मालपाणी आणि जंगली महाराज ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमारसूर्यवंशी आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या सत्रात सकाळी १० ते १२ या वेळात ज्येष्ठ संपादक सुनील माळी यांचे वृत्तलेखन या विषयावर व्याख्यान होणार असून दुपारी १२ ते १.३० या वेळात पत्रकारितेचे बदलते स्वरूप या विषयावर चपराकचे संपादक घनश्याम पाटील मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी २.३० ते ४ ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक संदीप वाकचौरे हे ग्रामीण पत्रकारिता या विषयावर आपले मत व्यक्त करणार आहेत.

४ ते ५.३० या वेळात पत्रकारितेकडुन समाजाच्या अपेक्षा या विषयावर सहकार अभ्यासक मधुकर नवले आपले मत व्यक्त करणार असून व्हाईस ऑफ मीडियाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे हे संघटनात्मक बांधणी, कौशल्य आणि दिवसभराचा आढावा व अभ्यागतांशी सायंकाळी ५.३० वाजता संवाद साधणार आहेत.

रविवार दि.१ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळात व्यावसायिक मानसिकतेचा विकास या विषयावर आंतरराष्ट्रीय ओमचे प्रमुख गगन मल्होत्रा,११ ते १ या वेळात प्रा. अरुण लेले हे मराठी पत्रकारितेतील शुद्धलेखन या विषयावर व्याख्यान देणार आहेत. दुपारी २ ते ३.३० या वेळात जेष्ठ महिला पत्रकार स्मिता गुणे, महिला पत्रकारिता व मार्केटिंग एक उद्योग या विषयावर आपले मत व्यक्त करणार आहे.

दुपारी ३ ते ५.३० संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे विचार मंथन समारोप आढावा, अभ्यागताशी संवाद साधणार आहे. त्यामुळे या कार्यशाळेला मोठ्या संख्येने पत्रकारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महिला विंगच्या प्रदेशाध्यक्षा रश्मी मारवाडी आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने यांनी केले आहे.

> दोन दिवस होणाऱ्या या कार्यशाळेत उपस्थित पत्रकार बांधवांसाठी दररोज दुपारी १.३० ते २.३० या वेळात भोजन व्यवस्था करण्यात आली असून हे दोन्ही दिवस उपस्थित राहणाऱ्यांसाठी सायंकाळी ५.३० वाजता साई दर्शनासाठी वाहन व्यवस्था केली आहे. आत्मा मालिक हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचेही आयोजन यावेळी करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषदेचे अधिकारी तुपाशी, आरोग्य कर्मचारी उपाशी

## पगार न झाल्यामुळे कर्मचारी आर्थिक विवंचनेत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून उशिरा मिळत आहे. त्यामुळे कर्मचार्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. आरोग्यातील काहींच्या आणि कारभारामुळे कर्जाचे हप्ते थकले असून व्याजाचा भूर्दंड सहन करावा लागत आहे.

जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचा एप्रिल महिन्याचा पगार झालेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. आरोग्य विभागातील काहींच्या चुकीचा सर्वसामान्य कर्मचाऱ्यांना भोगावा लागत आहे.



### काहींचा पगार नेहमीच उशिरा

जिल्हा परिषदेतील काही कर्मचाऱ्यांचा पगारकाय कर्मचाऱ्यांचा पगार नेहमीच उशिरा होत आहे. एका हेडवर प्रधान उशिरा येत असल्यामुळे कर्मचाऱ्यांचा पगार उशिरा होत आहे गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रकार आरोग्य विभागात सुरू आहे. याकडे अधिकाऱ्यांनी आता लक्ष द्यावे, अशी मागणी कर्मचाऱ्यांमधून होत आहे.

अनेकांना कर्जाचे हप्ते व मुलांच्या शिक्षणासाठी दर महिन्याला पैशांची गरज असते. परंतु गरजेच्या वेळीच कर्मचाऱ्यांना पगार न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. पगाराला उशीर का झाला, याबाबत कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांना विचारणा केली असता पगारासाठी अनुदान नसल्याचे सांगितले जात आहे. वास्तविक हे कारण नसून कर्मचार्यांच्या पगारावर वरिष्ठांच्या सह्या झालेल्या नसल्याची चर्चा सुरू आहे. सध्या शाळा महाविद्यालयांना उन्हाळ्याच्या सुट्टी आहे. या उन्हाळ्यासाठी अनेकांची मुले व कुटुंबीय फिरण्यासाठी बाहेर जात असतात. परंतु आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे पगार नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमुळे मोठा पेच निर्माण झालेला आहे. यामुळे घराघरात वादंग होत असून आरोग्य विभागाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

# संधान, नाईकवाडे संजीवनी पतसंस्थेवर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली संजीवनी सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान आणि प्रसिद्ध युवा उद्योजक महेंद्र नाईकवाडे यांची निवड करण्यात आली आहे. दोन्ही नविन संचालकांची निवड संस्थेच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, त्यांच्या माध्यमातून संस्थेच्या कार्यात नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

नवीन संचालकांचा सत्कार संस्थेचे चेअरमन प्रदीप नवले व उपाध्यक्ष संदीप गुरुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी उपाध्यक्ष राजेंद्र परजने, संचालक राजेंद्र बागुल, अनंत पाटील बडवर, श्रीकांत चांदगुडे, गणपत राऊत,जयराम सांगळे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही.व्ही. रोहमारे व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

संजीवनी सहकारी पतसंस्था ही माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी दूरदृष्टीने शेतकरी, कामगार, ठेवीदार आणि व्यापारी वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्थापन केलेली एक महत्वाची आर्थिक संस्था आहे. या संस्थेने गेल्या काही दशकांपासून ग्रामीण भागात आर्थिक सक्षमतेसाठी मोलाचे योगदान दिले आहे.



# विचार भारती आणि जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून

## जिल्ह्याचा सांस्कृतिक नावलौकीक अधिक उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न : ना. विखे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यादेवीच्या विचारांशी सुसंगत असा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करून जिल्ह्यचा सांस्कृतिक नावलौकीक अधिक उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न विचार भारती आणि जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून झाला असल्याचे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीचे औचित्य साधून विचार भारती आणि जनसेवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर गौरव आणि पालकमंत्री महोत्सवाचे उद्घाटन ना.विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देवून जिल्ह्याचा गौरव झाला.मात्र अहिल्यादेवी मांडलेल्या विचारांचा वस्तूपाठ नव्या पिढी समोर आणायचा असेल तर त्यांच्या विचाराने आपल्याला वाटचाल करावी लागेल.

अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट भारतीय इतिहासातील एक तेजस्वी अध्याय असल्याचा उल्लेख करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,त्यांचे कार्य केवळ राज्यापुरते सिमीत नव्हते तर संपूर्ण भारत वर्षासाठी प्रेरणादायी ठरले.धर्म न्याय आणि सामाजिक सुधारणा आणि भारतीय संस्कृतीचे पुनरूत्थान करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. जिल्ह्याचा सुपूत्री असल्याचा अभिमान आपल्या सर्वांना आहेच,परंतू यापेक्षाही महत्वाचे म्हणजे सामाजिक सुधारणातून महिलांच्या सबलीकरणाचा पाया त्यांनी अधिक मजबूत केला.हीच प्रेरणा घेवून शहरामध्ये त्यांचे भव्य स्मारक उभारून महीलासांठी काम सूरू करणार असल्याचे सुतोवाच पालकमंत्री विखे पाटील यांनी केले.



जिल्ह्याला लाभलेला सांस्कृतिक वारसा या महोत्सवातून अधोरेखीत झाला असून, जिल्हयातील कलाकारांनी यामध्ये दिलेलै योगदान खूप कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. अहील्यादेवीच्या प्रत्येक जयंतीदिनाला असा महोत्सव आयोजित करून हा जिल्हा अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांवर वाटचाल करणारा असल्याचा संदेश देण्यासाठी भविष्यात प्रयत्नशील राहण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.

महोत्सवात झालेल्या यशस्वी स्पर्धक आणि कलाकारांचा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमास विचार भारतीचे राजाभाऊ मुळे अरूण कुलकर्णी महोत्सव समितीच्या सौ.धनश्री विखे पाटील माजी महपौर बबासाहेब वाकळे,निखिल वारे,धनंजय जाधव यांच्यासह विचार भारतीचे तसेच महोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पारनेरला उभे राहणार स्मार्ट बसस्थानक

## आ. काशिनाथ दाते; पारनेर बसस्थानक पुर्नबांधणी भूमिपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : गेल्या अनेक वर्षांपासून पारनेर बस स्थानकाचा प्रश्न प्रलंबित होता. शासन स्तरावर पाठपुरावा करून या बस स्थानकासाठी निधी प्राप्त झाला आहे. महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने हा प्रश्न मार्गी लागला आहे. पारनेर सारख्या तालुक्याच्या ठिकाणी आता स्मार्ट बस स्थानक नक्कीच उभे राहील, असे मत आ. काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.

पारनेर येथील बसस्थानकाच्या पुर्नबांधणी कामाचे भूमिपूजन आ. दाते यांच्या हस्ते संपन्न झाले. महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नांतून या प्रकल्पासाठी २ कोटी ६६ लाख ५० हजार ८७५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



या अद्यावत बसस्थानकाच्या इमारतीमुळे पारनेर शहराच्या वैभवात भर पडणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पारनेर बसस्थानकाची दुरवस्था नागरिकांसाठी डोकेदुखी ठरली होती. सर्व सुविधांनी युक्त अशी आधुनिक इमारत उभारण्याची तालुक्यातील नागरिकांची दीर्घकालीन मागणी होती. आ. दाते यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करून निधी मंजूर केला आहे. नवीन इमारतीमुळे प्रवाशांना आधुनिक सुविधांचा लाभ होणार असून, शहराच्या सौंदर्यातही भर पडेल. या भूमिपूजन सोहळ्यास जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अशोकराव सावंत, विश्वनाथ कोरडे, प्रशांत गायकवाड, विक्रम सिंह कळमकर, राहुल शिंदे, वसंतराव चेडे, सुभाषराव दुधाडे, भास्करराव उचाळे, अर्पणा खामकर, युवराज पठारे, कांतीलाल ठाणगे, अशोक चेडे, सरपंच लहू भालेकर, मनोज मुंगसे, विकास पवार, मंगेश औटी, राजू औटी, सोनाबाई चौधरी, उपअभियंता काळभोर, आगार प्रमुख प्रशांत काळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि राज्य परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला जिल्हा उद्योग मित्र समितीचा आढावा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला.

बैठकीस महाव्यवस्थापक संतोष गवळी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, उद्योग अधिकारी अशोक बेनके, बालाजी बिराजदार, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चरचे प्रकाश गांधी, जागतिक बँक प्रकल्पाचे उपकार्यकारी अभियंता अभय भांगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अभियंता यु ए बोरुडे, पोलीस निरीक्षक यशवंत बाविस्कर, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे प्रवीण कुमार तेली, महाराष्ट्र मेकॅनिकल इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष हरजीतसिंग वाधवा, आमी संघटनेचे अध्यक्ष श्री खाकाळ यांच्यासह उद्योग मित्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.पंकज आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करण्यात यावीत. औद्योगिक क्षेत्रातील अनधिकृत स्टॉल तातडीने हटवण्यात यावेत. औद्योगिक क्षेत्रात सुरक्षिततेच्यादृष्टीने पोलीस गस्त वाढवण्यात यावी.

औद्योगिक क्षेत्राला पुरेशा प्रमाणात व विनाअडथळा विद्युत पुरवठा करण्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी. सनफार्मा ते निंबळक रस्ताचे कामही तातडीने करण्यात यावे. क्षेत्रामधील ड्रेनेजची स्वच्छता करण्यात यावी. त्याचबरोबर कचऱ्याची नियमितपणे विल्हेवाट लावत परिसर स्वच्छ राहील यादृष्टीनेही आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांना आयुष्यमान भारत योजनेतून आरोग्याच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी ई-बस सुविधा सुरु करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना करत औद्योगिक क्षेत्रातील सोयी-सुविधांच्या अनुषंगाने विस्तृत आढावाही डॉ. आशिया यांनी यावेळी घेतला.

# गुडशेडचे काम वेळेत पूर्ण करा-आ. काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव, राहाता तालुक्यासह शेजारील तालुक्याच्या शेतकऱ्यांना खरीप-रब्बी हंगामासाठी वेळेत खतांचा पुरवठा व्हावा, यासाठी कोपरगाव रेल्वे स्टेशन येथे खतांचा साठा करण्यासाठी गुड शेड बांधण्याचे सुरु असलेले काम अतिशय संथ गतीने सुरु आहे. हे काम जलदगतीने करून वेळेत पूर्ण करा अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी मध्य रेल्वेच्या पुणे विभागाचे विभागीय मॅनेजर राजेश कुमार वर्मा यांना दिलेल्या लेखी पत्रात केली आहे.

कोपरगाव रेल्वे स्टेशनवर विविध कंपन्यांच्या खत साठा करण्यासाठी पूर्वीचे चार वॅगण क्षमतेचे गुड शेड उपलब्ध आहे. परंतु अधिकचा खत साठा उतरविण्यासाठी भारत सरकारच्या खत आणि रसायने मंत्रालयाने कोपरगाव रेल्वे स्टेशनवर खत रेक पॉइंट मंजूर केला असून कोपरगाव रेल्वे स्टेशनच्या परिसरात रेल्वे विभागाने नव्याने १७ वॅगण क्षमतेचे गुड शेड बांधण्याचे टेंडर मागील वर्षी रेल्वे विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आले होते. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गुड शेड बांधण्याचे काम घेतलेल्या सबंधित ठेकेदाराकडून फेब्रुवारी महिन्यात काम देखील सुरु करण्यात आले आहे. परंतु आजपर्यंत ह्या गुड शेड बांधण्याचे काम पूर्ण झालेले नाही.

काम सुरु करण्यात आल्यापासून दोन ते तीन महिन्यात गुड शेड बांधण्याचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु अतिशय संथ गतीने काम सुरु असल्यामुळे पाच महिन्याचा कालावधी पूर्ण होत आला असला तरी अजूनही हे काम पूर्ण होवू शकले नाही. खरीप हंगामाची तयारी करण्यासाठी पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात खतांची मागणी होत असते. त्यामुळे खत कंपन्या देखील मोठ्या प्रमाणात रेल्वे वॅगणने खतांचा पुरवठा करीत असतात. कोपरगाव रेल्वे स्टेशनवर १७ वॅगण खते येणार आहेत. परंतु १७ वॅगण खते ठेवण्यासाठी गुड शेड बांधण्याचे कामच पूर्ण झालेले नाही. पावसाळा जरी जून महिन्यात सुरु होत असला तरी यावर्षी मे महिन्यात पडलेल्या अवकाळी पावसाने सर्वत्र दाणादाण उडवून दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर गुड शेड बांधण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे.



# जोर्वे गावात ग्रामसभेत झाला राडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संपूर्ण गाव एकत्र एकवटले असताना आदिवासींचा निधी यांचा विविध विकास कामांचा निधी नेमका कुठे गेला असे अनेक प्रश्न विचारले असताना विखे समर्थक सत्ताधाऱ्यांना एकाही प्रश्नाचे उत्तर न देता त्यांनी ग्रामसभा गुंडाळण्याचा प्रयत्न केल्याने ग्रामसभेमध्ये मोठा राडा झाला.

जोर्वे गावात गेली अडीच वर्ष या निधीचा संपूर्णपणे गैरवापर होत असल्याने, जाब विचारण्यासाठी सर्व ग्रामस्थ एकत्र आले होते. परंतु सरपंचांकडे याचे उत्तरच नसल्याने सत्ताधाऱ्यांकडून प्रश्न विचारांना विचारणाऱ्यांनाच दम देणे, धक्काबुक्की करणे असे प्रकार सुरू झाले. एकीकडे पंचक्रोशीत सांगायचे आम्ही विकासकामांची डोंगर उभे करत आहोत. परंतु त्याच वेळेस जेव्हा एक एक करून अनेक घोटाळे बाहेर निघायला सुरुवात झाली, त्यावेळेस मात्र ते हमरीतुमरीवर आले.

ग्रामपंचायतीत कोणत्या गोष्टी खरेदी केल्या जातात व कोणाला दिले जातात हे आम्हालाच कळत नाही, कोणता निधी कुठे वापरला जातो हेही कळून दिले जात नाही, गावात ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला आलेला निधीही परस्पर दुसरीकडे वळवला जातो, वेगळाच माणसाच्या नावाने अकाउंट काढून त्यावर निधी वर्ग काढून तोही पैसा लंपास केला जातो, छोट्या छोट्या कामांचे मोठ मोठी बिले काढण्यात येतात, असे अनेक आरोप झाले.

यावेळी सुरेश थोरात,सत्यजित थोरात हर्षल काकड, उपसरपंच बादशहा बोरकर, संजय थोरात, संपत थोरात, मुकेश काकड, राहुल बोरकर, भाऊसाहेब दिघे, बालम भवर, माणिकराव यादव, राजू थोरात, रमेश दिघे, अक्षय दिघे, विठ्ठल काकड, पंढरीनाथ बलसाने, गगन थोरात, डॉ. पवन काकड, अजित थोरात, शुभम दिघे, शांताराम दिघे, अमित थोरात, अण्णासाहेब थोरात, कैलास क्षीरसागर,जीवन काकड, ऋषिकेश थोरात, बाळासाहेब काकड, संदीप यादव, दत्तू नाना काकड आदी उपस्थित होते.

# महानगर बँकेच्या निवडणुकीत सुमनताई शेळकेंची भरारी

## उद्या मतदान; राज्यात ८० हजार सभासद घेणार निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : दि. १ जून रोजी महानगर बँकेची निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी राज्यातील एकूण ८० हजार सभासद आहेत. सर्वाधिक २९ हजार सभासदाचे मतदान हे मुंबई शहरात असून २४ हजार मतदान ठाणे शहरात आहे. ८ हजार मतदान हे पुणे शहरात असून ६ हजार मतदान हे अहिल्यानगर, ३ हजार नाशिक, १ हजार ५ संभाजी नगर येथे आहे.

बँकेच्या २५ - ३० या कालावधीसाठी संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक होत आहे. यासाठी एकुण १८ जागा आहे. एकूण ४ मतदान भाग आहेत. सर्व साधारण मतदार संघ १४, महिला २, भटक्या व विमुक्त जाती १, ओबीसी १ अशा जागा निवडवयाच्या आहेत. यासाठी ३२ मतदान केंद्र असून ६५ बूथ आहेत.

या निवडणूकीत सासू विरुद्ध सून असे २ पॅनल उभे आहेत तर इतर ५ उमेदवार हे अपक्ष आहेत. वरकरणी ही लढत तुल्यबळ वाटत असली, तरी निवडणुकीचा निकाल लागल्यावर भ्रमाचा भोपळा फुटेल. बँकेच्या विद्यमान अध्यक्ष सुमनताई गुलाबराव शेळके यांनी प्रचाराला सुरुवात केली नव्हती, कारण त्यांची सदैव ही इच्छा होती की, ही निवडणूक बिनविरोध पार पाडवी. शेळके विरुद्ध शेळके असा संघर्ष होऊ नये आणि बँकेची प्रतिष्ठा अबाधित राहावी. दुर्दैवाने, त्यांनी सर्व प्रयत्न करूनही ही निवडणूक बिनविरोध होऊ शकली नाही.



बँकेच्या सभासदांच्या भल्यासाठी आणि शेळके साहेबांच्या कर्तुत्वाला नेहमी विरोध करणाऱ्यांच्या हातात बँक जाऊ नये, यासाठी ''संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके'' पॅनल उभारण्यात आले.

आज पारनेर तालुक्यातील सहकारी पतसंस्था माद्यमातून सर्व सामान्यच्या १ हजार २०० कोटीच्या ठेवी संकलित केल्या होत्या. त्या आज बुडण्याच्या स्थितीत आहे. यातील बहुतेक संस्था चालक कारागृहा मध्ये आहेत. अशा स्थितीत तालुक्यातील ठेवीदारांना कोणीही वाली नाही. पण जी एस महानगर बँकेचा शून्य टक्के एनपीए, ३ हजार कोटी रुपयांच्या ठेवी, ४ हजार ५०० कोटीचे खेळते भांडवल, ८० हजार सभासद, ७० शाखा, ५०० कर्मचारी, नवीन होत असलेली इमारत यावर डल्ला मारण्यासाठी ही मंडळी एकत्रित आली असावी, असे सभासद बोलताना दिसतात.

त्यांचा प्रचार संथ गतीने चालला असला तरी मतदारांवर परिणाम करून मतदान करणे, मोहाकडे नेणारा आहे. तर विरोधकांचा प्रचार भपकेबाज असला, तरीही मतदारांवर त्याचा फारसा परिणाम होत आहे, असे दिसत नाही. कारण त्यांचे सर्व प्रचारक हे सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांनीच नावारूपाला आणलेले आहेत. या निमित्ताने ही मंडळी सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांच्या उपकाराची परतफेड कशी करतात, हे जनतेला कळणार आहे. याबाबत पुढारी किती गद्दार आहेत , हे दबक्या आवाजात चर्चा होताना दिसत आहे .

निवडणूकीच्या रणधुमाळीत जी एस महानगर बँकेवर, कारभारावर, भ्रष्टाचारवर कोणतीही टीका दिसत नाही, त्याला कारण बँकेची प्रगती हेच आहे. म्हणून विरोधकांकडे बँकेबाबत बोलण्यासारखे काही नाही. फक्त शेळके कुटूंबातील हेवेदाव्यांवर आधारित टीका दिसते. या बँकेचा संबंध हे शेळके साहेब पारनेर तालुक्यातील असल्याने पारनेरशी जोडला गेला, त्यामुळे पारनेरला साहेबांनी प्राधान्य दिले. म्हणून तेथे सभासद वाढले आणि बँकेमुळे पारनेरच्या विकासात भर पडली, म्हणून तालुक्यात बँकेची चर्चा आहे. भ्रष्टाचारी, स्वार्थी, संधीसाधू लोकांना या बँकेच्या निवडणूक निमित्ताने विरोधी पॅनलच्या माध्यमातून शिरकाव करण्याची संधी मिळाली आहे. विरोधी पॅनलच्या प्रचारातून हे स्पष्ट झाले आहे. सुमन ताईंनी मात्र शेळके साहेबांचा निवडनुकीतील वारसा जपलेला दिसत आहे. प्रचार संथ, संयमी, शांत आणि नेमका चालू आहे.

# संपादकीय

## स्मरण अहिल्याबाईंचे

पती खंडेराव होळकर यांच्या अकाली निधनानंतर राज्यकारभार हाती घेणाऱ्या अहिल्याबाई होळकर एक सक्षम नेत्या म्हणून उदयास आल्या. त्यांनी दूरदृष्टीने अनेक सामाजिक कामे केली. एक हुशार प्रशासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. जलसंधारण, रस्त्यांच्या कडेची झाडे, स्थापत्यकलेतील अनेक कामे त्यांच्या दूरदष्टीची प्रतिके आहेत. तीनशेव्या जयंतीनिमित्त त्यांच्या कर्तबगारीचा वेध घ्यायला हवा. महिला शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करून अहिल्याबाईंनी सामाजिक रूढी मोडल्या. समाजाच्या प्रगतीसाठी महिला सक्षमीकरण आवश्यक आहे हे समजून घेतले. 'माझ्या आजीसाठी, मुलीचे शिक्षण हे गरिबीतून बाहेर पडण्याचे तिकीट होते' हा त्यांचा विश्वास लिंग समानतेबद्दलच्या आधुनिक चर्चेत अजूनही प्रतिध्वनित होत आहे. आज, अनेक संघटना आणि चळवळी मुलींसाठी दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतात. शैक्षणिक सुधारणांचा पाया रचून, त्यांनी केवळ असंख्य व्यक्तींचे जीवनच बदलले नाही, तर त्यांच्या राज्याच्या एकूण प्रगतीतही योगदान दिले. आरोग्यसेवेतील अहिल्याबाईंचे योगदानही तितकेच परिवर्तनकारी होते. त्यांनी सुलभता, स्वच्छता आणि समुदाय कल्याण प्रदान करणाऱ्या आरोग्यसेवेचा पाया रचला. त्या काळात सार्वजनिक आरोग्य ही संकल्पना व्यापकतेने ओळखली जात नव्हती. त्या काळात अहिल्याबाईंनी रुग्णालये आणि दवाखाने स्थापन केले. त्यामुळे त्यांच्या प्रजेला वैद्यकीय सेवा उपलब्ध होईल, याची खात्री झाली. त्यांच्या कार्यामध्ये स्वच्छतेचा प्रचार समाविष्ट होता. हे त्या काळातील क्रांतिकारी पाऊल होते. आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून त्यांनी आरोग्यगरजा पूर्ण केल्या आणि भविष्यातील सार्वजनिक आरोग्य उपक्रमांसाठी मार्ग मोकळा केला. आधुनिक सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्ये, विशेषतः ग्रामीण आणि वंचित समुदायांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या धोरणांमध्ये, आरोग्यसेवेचे महत्त्व मान्य करण्याची त्यांची दूरदृष्टी स्पष्ट दिसते. अहिल्याबाईंच्या कारकिर्दीमध्ये व्यापक पायाभूत सुविधांचा विकास झाला. त्यामुळे आर्थिक वाढ आणि सामाजिक संपर्क वाढला. त्यांनी रस्ते, पूल आणि सार्वजनिक इमारतींचे बांधकाम सुरू केले. त्यांच्या राज्यात व्यापार आणि गतिशीलता सुलभ झाली. या पायाभूत सुविधांनी दुर्गम समुदायांना जोडले आणि आर्थिक विकासासाठी एक चौकट प्रदान केली. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करून अहिल्याबाईंनी त्यांच्या राज्याच्या एकूण समृद्धीमध्ये योगदान दिले. लवचिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीतील त्यांच्या प्रयत्नांना संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांनी पुष्टी दिली आहे. ते आर्थिक विकासासाठी शाश्वत पायाभूत सुविधांच्या महत्त्वावर भर देते. अहिल्याबाईंच्या पुढाकारामुळे अधिक प्रमाणात परस्परांशी जोडलेला समाज निर्माण झाला. त्यांनी वाणिज्य सक्षम केले आणि विविध गटांमध्ये समुदायाची भावना निर्माण केली. अहिल्याबाईंच्या कारकिर्दीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उपेक्षित समुदायांच्या उन्नतीसाठी त्यांची समर्पितता. त्यांनी विविध कल्याणकारी योजना राबवल्या. आर्थिक मदत, निवारा आणि व्यावसायिक प्रशिक्षणावर त्यांचा भर होता. त्यांची धोरणे विशेषतः विधवा, अनाथ आणि आर्थिक अडचणींना तोंड देणाऱ्यांसाठी फायदेशीर होती. त्यामुळे असुरक्षित लोकसंख्येला संसाधने आणि संधी उपलब्ध होतील याची खात्री झाली. सामाजिक कल्याणाप्रती अहिल्याबाईंचा दृष्टिकोन समग्र होता. त्यांना माहीत होते, की खऱ्या सक्षमीकरणासाठी आर्थिक पाठबळ आवश्यक आहे; परंतु कौशल्यांचा विकास आणि चांगले सामाजिक एकीकरणदेखील आवश्यक आहे.

पारंपारिक कलाकृतींना, विशेषतः माहेश्वरी साडीशी संबंधित व्यवहार पुनरुज्जीवित करण्यासाठी सुरू असलेल्या उपक्रमांमध्ये अहिल्याबाईंचा प्रभाव अजूनही जाणवत आहे. उत्कृष्ट कारागिरीसाठी ओळखली जाणारी माहेश्वरी साडी भारतातील सांस्कृतिक वारशाचे प्रतीक बनली आहे. कारागिरांना अहिल्याबाईंनी दिलेल्या पाठिंब्यामुळे या पारंपारिक कलाकृतींच्या भरभराटीचा पाया घातला गेला. पारंपारिक पद्धतींना आधुनिक बाजारपेठेतील गतिशीलतेशी जोडून हे उपक्रम माहेश्वरी साडीचा सांस्कृतिक वारसा जपताना कारागिरांना योग्य वेतन आणि शाश्वत उपजीविका सुनिश्चित करतात. शाश्वत कापूस लागवड, सेंद्रिय शेती आणि पारंपारिक कलांवर लक्ष केंद्रित करणारे समकालीन उपक्रम अहिल्याबाईंच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहेत. हे कार्यक्रम शेतकऱ्यांना शाश्वत पद्धतींचे प्रशिक्षण आणि उच्च-उत्पादन देणाऱ्या बियाण्यांची उपलब्धता देतात. सामाजिक आणि आर्थिक सुधारणांव्यतिरिक्त अहिल्याबाई कला आणि स्थापत्यकलेच्या संरक्षक होत्या. त्यांनी असंख्य मंदिरे, किल्ले आणि सार्वजनिक स्मारके बांधली, ती त्यांच्या कलात्मक आवडीचे प्रतिबिंब आहेत. महेश्वर किल्ला आणि महेश्वर मंदिर संकुलाची पुनर्बांधणी हे त्यांचे सर्वात प्रसिद्ध योगदान आहे. अहिल्याबाईंच्या संरक्षणामुळे संगीत आणि नृत्यासह अनेक कला विस्तारल्या. त्यांनी एक चैतन्यशील सांस्कृतिक वातावरण निर्माण केले. अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनाचा आणि कारकिर्दीचा विचार करताना, त्यांचे शासन मॉडेल समकालीन समाजासाठी महत्वाचे धडे देते. अहिल्याबाईंचा वारसा सामाजिक न्याय आणि समानता वाढवण्यात दूरदर्शी नेतृत्वाच्या प्रभावाचा पुरावा आहे. उपेक्षित समुदायांचे उत्थान, शिक्षणाला प्रोत्साहन आणि आर्थिक संधींना प्रोत्साहन देण्याची त्यांची वचनबद्धता आजच्या प्राधान्यांशी सुसंगत आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे चारित्र्य आणि प्रशासन कल्याण, शिक्षण आणि चांगल्या सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रदान करण्यावर केंद्रित नेतृत्वशैलीचे उदाहरण आहे. सामाजिक कल्याण आणि समावेशकतेच्या तत्त्वांवर आधारित अहिल्याबाईंच्या दूरदर्शी धोरणांनी संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांची पूर्वछाया दाखवली. खरे नेतृत्व केवळ सत्ता धारण करण्याबद्दल नाही, तर सर्वात असुरक्षित लोकांचे संरक्षण आणि उत्थान करण्याबद्दल आहे, याची चुणूक त्यांचे जीवन आपल्याला दाखवते. आज तिनशेव्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करताना त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या आणि कार्यकुशलतेच्या नानाविध बाजू आणि कंगोरे लक्षात ठेवायला हवेत. तसे झाले तरच त्यांच्या कणखर व्यक्तिमत्वातून काही शिकल्यासारखे होईल.

# गुंतवणूकगुरूची निवृत्ती

**परामर्श**

**– हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार**



अलिकडेच वयाच्या ९४ व्या वर्षी जागतिक कीर्तीचे गुंतवणूकतज्ज्ञ वॉरन बफे निवृत्त झाले. मात्र निवृत्त झाल्यानंतरही त्यांनीच उभारलेल्या हाथवे बर्कशायर कंपनीमध्ये आपली गुंतवणूक कायम ठेवण्याची घोषणा त्यांनी केली. ते जगातील पाचव्या क्रमांकाचे श्रीमंत असून गेल्या ६० वर्षांपासून कंपनीचे 'सीईओ' आहेत. एक यशस्वी, चतुर आणि जगातील सर्वात प्रतिष्ठित गुंतवणूकदार म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली.

वयाच्या ९४ व्या वर्षी जागतिक कीर्तीचे गुंतवणूकतज्ज्ञ वॉरन बफे निवृत्त झाले आहेत. वास्तविक, कोणतीही व्यक्ती वयाची नव्वदी उलटून गेली तरी काम करत असल्याचे क्वचितच दिसते. परंतु बफे सतत सक्रिय राहिले आणि नुकत्याच बर्कशायर हॅथवेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या वर्षअखेरीस निवृत्त होणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे. कंपनीच्या अडीच लाख गुंतवणूकदारांच्या दृष्टीने हादेखील एक धक्काच होता. कंपनीचे विद्यमान उपाध्यक्ष ग्रेग अबेल हे आपली जागा घेतील, असेही बफे यांनी जाहीर केले आहे. मात्र निवृत्त झाल्यानंतरही बर्कशायरमध्येच आपली गुंतवणूक कायम ठेवण्याची घोषणा करत, बफे यांनी ग्रेग यांच्यावरील विश्वास प्रकट केला. बर्कशायरची उलाढाल १.१६ ट्रिलियन डॉलर्स इतकी आहे. तिचे १८९ 'ऑपरेटिंग बिझिनेस' आहेत. कंपनीकडे २६४ अब्ज डॉलर्सचे शेअर्स असून ३४८ अब्ज इतकी नगद रक्कमही आहे. बफे हे या कंपनीचे मुख्याधिकारी असल्यामुळे आजवर सर्वसामान्य नागरिकांचा कल बर्कशायरमध्ये गुंतवणूक करण्याकडे राहिला आहे. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीच्या संकेतांनंतर बर्कशायरच्या समभागांवर तात्कालिक परिणाम संभवतो. बफे यांनी आपला वारसदार विचारपूर्वक निवडला आहे. २०११ मध्ये स्टीव्ह जॉब्स यांनीदेखील ॲपलची सूत्रे टीम कूक यांच्याकडे सोपवली. त्यांच्या काळातही ॲपलची घोडदौड सुरूच आहे. बफे हे जगातील पाचव्या क्रमांकाची श्रीमंत व्यक्ती आहेत. गेल्या ६० वर्षांपासून ते या कंपनीचे 'सीईओ' आहेत. या कालावधीत त्यांनी स्वतःची एक यशस्वी, चतुर आणि जगातील सर्वात प्रतिष्ठित गुंतवणूकदार म्हणून ओळख निर्माण केली. निवृत्तीनंतरही ग्रेग यांना आवश्यक असेल तेव्हा मार्गदर्शन करेन. परंतु अंतिम निर्णय त्यांचाच असेल, हे बफे यांनी स्पष्ट केले ते बरे झाले.

ग्रेग हेदेखील ६२ वर्षांचे असून त्यांचा जन्म कॅनडामध्ये झाला. एका कामगार कुटुंबात वाढलेल्या ग्रेग यांनी लहानपणापासूनच काम करायला सुरुवात केली. घरोघरी जाऊन पत्रके वाटणे, वडिलांसोबत अग्नशामक यंत्रे भरणे अशी मजुरीची कामे ते करत असते. ते पदवी मिळाल्यानंतर ऊर्जाक्षेत्रात काम करत होते आणि १९९२ मध्ये बर्कशायर हॅथवेमध्ये नोकरीला लागले. बर्कसायर हॅथवे ही १८३९ मध्ये स्थापन झालेली मूळची कापड कंपनी. साठ वर्षांपूर्वी वॉरन बफे यांनी ती खरेदी केला आणि एका महाकाय अशा उद्योगसमूहात तिचे रूपांतर केले. आज अमेरिकेतील जवळजवळ प्रत्येक नामवंत उद्योगात बर्कशायरची गुंतवणूक आहे. बफे यांची संपत्ती १६८ अब्ज डॉलर्स इतकी असून ती जवळपास सर्व समभागांच्या स्वरूपात आहे. आपल्याकडील बर्कशायर हॅथवेतील कोणताही समभाग बफे विकणार नाहीत. हे समभाग त्यांच्या मृत्यूनंतर दान केले जाणार आहेत. जगातील कोट्यवधी लोक शेअर बाजारातून पैसे कमावण्यासाठी बफे यांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शनाचा अवलंब करतात. बफेंचे पाच गुंतवणूक मंत्र आहेत.

पहिला म्हणजे समभाग विकत घेतल्यानंतर एका दिवसात किंवा फार कमी वेळात विकण्यापेक्षा चांगल्या कंपन्यांचे समभाग खरेदी करून त्यातील गुंतवणूक दीर्घकाळ टिकवून ठेवणे चांगले. अशा समभागांमधील दीर्घकालीन गुंतवणूक जास्त परतावा देते. दुसरा मंत्र म्हणजे बाजारात लवकरात लवकर श्रीमंत होण्याची हाव चुकीच्या दिशेने घेऊन जाऊ शकते. उत्तम पोर्टफोलिओ तयार करणे ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. त्यासाठी खूप संयम लागतो. बाजारातून उत्तम परतावा मिळण्यासाठी उत्तम व्यवसाय मॉडेल आणि चांगले व्यवस्थापन असलेल्या कंपन्यांमध्येच गुंतवणूक करावी. तिसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे पैसा हुशारीने गुंतवणे, कारण ध्येय समोर ठेवून केलेली गुंतवणूकच फायदेशीर ठरते. केलेल्या गुंतवणुकीतून पैसा कसा वाढणार आहे, याचा अंदाजच येत नसेल, तर त्यापासून दूर राहिलेले बरे. चौथा दखलपात्र मुद्दा म्हणजे आपली सर्व अंडी एकाच टोपलीत ठेवू नयेत. गुंतवणुकीसाठी असलेली रक्कम वेगवेगळ्या गोष्टींमध्ये विभागावी. संपूर्ण पैसा डेट किंवा इक्विटीत गुंतवू नये. सर्वांमध्ये समतोल ठेवा. पाचवी महत्वाची बाब म्हणजे रास्त भावाने समभागांची खरेदी करावी. एखादी कंपनी उत्तम दर्जाची उत्पादने बनवत आहे किंवा ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देत आहे, असे वाटत असेल तर त्यात गुंतवणूक करण्याचा विचार नक्कीच करता येतो. एखाद्या मोठ्या कंपनीचे समभाग उच्च भावाला खरेदी करण्यापेक्षा चांगल्या कंपनीचे समभाग वाजवी किमतीला घेणे केव्हाही चांगले.

वॉरेन बफे हे उत्तम गुंतवणूकदार आहेतच, पण दानशूरपणासाठीही ओळखले जातात. निवृत्तीची घोषणा करण्यासोबतच त्यांनी आपल्याकडील एकही शेअर विकणार नाही आणि मृत्यूनंतर आपली मालमत्ता दान केली जाईल, हे स्पष्ट केले आहे. आपण बफे यांचा सुरुवातीपासूनचा प्रवास जाणून घेतल्यास त्यांचे यश कशात आहे, हे लक्षात येईल. ते अनेकदा 'सोशल मीडिया'वर आपल्या यशाचे मंत्र शेअर करतात. अलिकडेच, लिंक्डइनवरील एका पोस्टमध्ये त्यांनी जगभरातील तरुणांना श्रीमंत होण्याचा मंत्र दिला. 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये श्रीमंत होण्याचा सोपा मंत्र देताना त्यांनी म्हटले आहे की, तुमचे मूल्य ५० टक्क्यांनी वाढवण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तुमचे संवादकौशल्य सुधारणे. तुमच्याकडे ज्ञान असेल पण चांगल्या पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचवू शकत नसाल, तर त्याला काही मूल्य नाही. त्यांच्या मते स्वतःमध्ये गुंतवणूक करणे ही सर्वोत्तम गुंतवणूक असून सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे दररोज स्वतःमध्ये सुधारणा करणे. बफे यांच्या मते योग्य समजुतीने गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे. आपल्याला समजत नसलेल्या गोष्टीमध्ये पैसे गुंतवणे हा सर्वात मोठा धोका आहे. स्वतःच्या संशोधनावर विश्वास ठेवावा आणि गुंतवणूक सुरू करावी; कोणाच्याही सल्ल्यावर विश्वास ठेवून नाही. यासोबतच ते म्हणतात की, स्वस्त शेअर्सच्या मागे धावणे थांबवा. त्याऐवजी योग्य किमतीत चांगले शेअर्स खरेदी करा. केवळ मजबूत मूलभूत तत्त्वे असलेल्या कंपन्याच दीर्घकाळात उत्तम परतावा देतात. बफेट यांच्या मते चढ-उतारांना न डगमगता दृढ राहिले तरच शेअर्समधील गुंतवणुकीवर चक्रवाढीची जादू तेव्हाच दिसून येईल.

वॉरेन बफे लोकांना क्रेडिट कार्डबाबतही सतर्क करतात. त्यांच्या मते आपले संपूर्ण आयुष्य क्रेडिट कार्डवर अवलंबून राहू लागते, तेव्हा क्रेडिट कार्ड वापरणे टाळले पाहिजे. क्रेडिट कार्डचा वापर पिगी बँकेसारखा करणे टाळावे. तसेच कर्ज घेऊन शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचा विचार कधीही करू नये. 'ब्लूमबर्ग'च्या रिअल टाईम बिलियनेअर्स इंडेक्सनुसार वॉरेन बफेंची एकूण संपत्ती १६९ अब्ज डॉलर (सुमारे १४ लाख कोटी रुपये) असून ते जगातील पाचव्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहेत. २०२५ मध्ये आतापर्यंत बफे कमाईच्या बाबतीत अव्वल स्थानी असून त्यांची संपत्ती २६.६ अब्ज डॉलर्सने वाढली आहे. पोर्टफोलिओमध्ये समाविष्ट असलेल्या स्टॉकमध्ये बर्कशायर हॅथवे, बीवायडी, न्यू होल्डिंग्ज, एऑन, टी-मोबाइल, व्हेरिसाइन आणि कोका कोला हे त्यांचे विशेष आवडते शेअर्स आहेत. गेल्या वर्षी वॉरेन बफे यांनी म्हटले होते की, आमच्या कंपनीने भारतात प्रवेश केलेला नाही, पण तिथे अनेक संधी आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ उत्तम प्रकारे होत असून तरुणांच्या या देशात गुंतवणूक करणे लाभदायक ठरू शकेल. अलीकडच्या काळात बफे यांच्या बर्कशायर हॅथवेने वेगवेगळ्या कंपन्यांमधील आपले भागभांडवल विकून २८ लाख कोटी रुपयांचा निधी उभारला. २००८-०९ ची मंदी सुरू होण्यापूर्वी त्यांनी नेमके हेच केले होते. मार्च २००० मध्ये डॉटकॉम कंपन्यांचा फुगा फुटला होता. त्याचाही अंदाज त्यांना आला होता. आता अनेक कंपन्यांमधील भागभांडवल विकल्यामुळे त्यांना जागतिक मंदीचा अंदाज आला आहे काय, अशी भीती वाटू शकते. वॉरेन बफे यांच्याकडे एखाद्या मोठ्या देशाच्या अध्यक्ष वा पंतप्रधानापेक्षा जास्त ताकद आहे. त्यांच्याकडे पाहून असंख्यजण शेअर बाजाराकडे वळले आहेत. गुंतवणूकदार त्यांना आदर्श मानतात.

# म्हाळुंगी पुलाच्या दिरंगाईवरुन राजकारण तापले?

### अडीच वर्ष काम रखडविणाऱ्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर श्रेयवादाचा कलंत्रींचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर शहरातील म्हाळुंगी नदीवरील साईनगरकडे जाणारा पूल रखडल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये आलेल्या पुरामुळे हा पूल खचला होता. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात आणि आमदार सत्यजित तांबे यांनी पुलाच्या दुरुस्तीसाठी तातडीने पाठपुरावा करून निधीची मागणी केली होती. मात्र, स्थानिक भाजप व महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी या कामाचे राजकारण करून ते जाणीवपूर्वक रखडवले असल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक शैलेश कलंत्री यांनी केला आहे.



> संगमनेर तालुक्यातील विकासकामे अडवून नागरिकांना त्रास देण्याचा उद्देश ठेवून काम करत असल्याचा आरोप कलंत्री यांनी केला. पंपिंग स्टेशन, साईनगर, घोडेकर मळा या परिसरातील नागरिकांची गैरसोय करत, स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून केवळ श्रेयवादासाठी हे काम जाणीवपूर्वक रखडवले असल्याचा दावा त्यांनी केला. या कामाच्या निघालेल्या वर्क ऑर्डरलाही भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांमुळे स्टे मिळवण्याचा प्रयत्न केला गेला, असेही त्यांनी नमूद केले. म्हाळुंगी पुलाचे रखडलेले काम, नागरिकांची झालेली गैरसोय आणि विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड या सर्व बाबींसाठी महायुतीचे स्थानिक पदाधिकारी जबाबदार आहे.
>
> **– शैलेश कलंत्री, माजी नगरसेवक**

कलंत्री यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे म्हटले आहे की, म्हाळुंगी नदीवरील पूल खचल्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि तत्कालीन नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांनी तात्काळ पाहणी करून नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी पुलाची व्यवस्था केली होती. तसेच, ३० नोव्हेंबर २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नवीन पुलासाठी साडेचार कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली, यासाठी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मंजुरीही दिली होती. मात्र, स्थानिक भाजपा व महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी या कामाचे श्रेय घेण्याच्या नादात या पुलाचे राजकारण सुरू केले. त्यांचे हे कृत्य स्थानिकांच्या मनात द्वेष निर्माण करण्याच्या हेतूने असल्याचा दावा कलंत्री यांनी केला आहे.

शैलेश कलंत्री यांनी पुढे म्हटले आहे की, गेल्या अडीच वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत आणि नगरपालिकेमध्ये प्रशासक आहे. राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता आहे. जिल्ह्यातील प्रशासन आणि निधी वाटपावर सत्ताधाऱ्यांचे नियंत्रण आहे. तरीही त्यांनी या कामासाठी कोणताही नवीन निधी दिला नाही. उलट, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून तहसील कार्यालयाजवळ सुरू असलेल्या शॉपिंग सेंटरचे काम अर्धवट बंद करून तो निधी म्हाळुंगी नदीवरील पुलासाठी वळवला. नवीन निधी मिळवण्याऐवजी सुरू असलेले काम थांबवून निधी वळवण्याचा अट्टाहास केल्यामुळेच मागील दोन वर्षापासून हे काम बंद असल्याचा आरोप कलंत्री यांनी केला आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि आमदार सत्यजित तांबे यांनी नवीन पुलाच्या उभारणीसाठी सातत्याने सरकारकडे पाठपुरावा केला आहे. तसेच, स्थानिक नागरिकांनीही वेळोवेळी आंदोलने केली आहेत. राज्यात महायुतीची सत्ता असतानाही साईनगरसाठी संरक्षक भिंत आणि म्हाळुंगी नदीवरील छोटा पूल यासारख्या मूलभूत अपेक्षाही ते पूर्ण करू शकले नाहीत, अशी टीका त्यांनी केली. इतका छोटा निधीही त्यांना मिळू शकला नाही, असे कलंत्री म्हणाले.

# पेन्शनधारकांची खासदार वाकचौरेंसोबत उद्या बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर** : राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने शिर्डी, कोपरगाव, राहाता व परिसरातील सर्व पेन्शन धारकांची महत्वाची बैठक दि.१ जुन २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या निवासस्थानी शिर्डी येथे आयोजीत करण्यात आली आहे. बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा, खा. वाकचौरे यांचा सत्कार, संघटनात्मक बाबींवर चर्चा होणार आहे.

यावेळी सुभाषराव पोखरकर, अजित घाडगे, देविसिंग जाधव, बापूराव बहिरट आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. दोन्ही तालुक्यातील जास्तीत जास्त पेन्शनरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संपतराव समिंदर, आशाताई शिंदे, दशरथ पवार, गोकुळ चिंतामणी, सुभाष अरसुळे आदिनी केले आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार सोहळा

कार्यकर्त्यांना मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे. मंत्री विखे पाटील यांनी नियोजन बैठकीत सर्व विभागांनी पूर्ण केलेल्या कामांचा आढावा घेवून सर्व काम एक आठवड्यात पूर्ण करण्याचे निर्देश दिले. शाळा खोल्यांचे उद्घाटन करताना सर्व वर्ग डिजिटल क्लासरुम करण्याच्या सूचनाही दिल्या. सभेच्या ठिकाणाची पाहणी करून मंत्री विखे पाटील यांनी पावसाची शक्यता लक्षात घेवून त्यादृष्टीने कार्यक्रमाचे नियोजन करण्याची सूचना पदाधिकारी कार्यकर्ते आणि प्रशसनाला दिल्या. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, यंदाच्या वर्षी माऊली सेवा प्रतिष्ठानचे डॉ. राजेंद्र धामणे व सुचेता धामणे, बीड जिल्ह्यातील गेवराई येथील आई संस्थेचे संतोष गर्जे, कोल्हापूर येथील सावली केअर सेंटरचे अध्यक्ष किशोर देशपांडे, शेवगाव तालुक्यातील उचल फौंडेशनचे अध्यक्ष सचिन खेडेकर यांना यंदाच्या वर्षी पुरस्कार जाहीर झाले आहेत.

## उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करा

गायकर, कैलासराव पानसरे, रवींद्र भोकनळ, जगन्नाथ घुगरकर, कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे आदी उपस्थित होते. माजी कृषीमंत्री थोरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्वावर कारखाना व सहकारी संस्था सुरू आहेत. अत्यंत काळजीपूर्वक व काटकसरीने कारखान्याचे कामकाज सुरू असून शेतकऱ्यांना चांगला भाव देण्यासाठी कारखाना कायम कटिबद्ध आहे. ऊस वाढ योजनेअंतर्गत एकरी शंभर टनापेक्षा जास्त ऊस उत्पादन करणे आणि ऊस लागवडीचे नियोजन करणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व शेतकऱ्यांनी जून महिन्यामध्ये ऊस लागवड केली तर तोडणीसाठी अडचणी तयार होतात. म्हणून टप्प्याटप्प्याने लागवडीचे नियोजन होणे अत्यंत गरजेचे आहे. याचबरोबर कमी पाणी, कमी श्रम आणि जास्त उत्पादन गरजेचे आहे. शेतीमध्ये अनेक दिवसाचे सातत्याने उत्पादन होत असल्याने आता सेंद्रिय युक्त द्रव्यांची कमतरता त्यामध्ये निर्माण झाली आहे. ती भरून काढण्यासाठी कारखान्याच्या कृषी विभागाच्या मदतीने आपल्याला सेंद्रिय द्रवांचा वापर करावा लागेल.

सुरेश माने म्हणाले की, शेतीमध्ये जास्त पाण्यापेक्षा पाण्याचे नियोजन महत्त्वाचे आहे. याकरीता ठिबक सिंचनचा सर्वाधिक वापर करा. मे आणि जून महिन्यामध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव आपल्याला कमी करता येतो. यासाठी असणाऱ्या वेगवेगळ्या पद्धती त्यांनी समजावून सांगितल्या. उसाची व्हरायटी, लागवड पद्धत, खते, फवारणी याबाबत शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर पिंपारणे, शेडगाव, शिबलापुर, पानोडी येथेही ऊस विकास मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे स्वागत ॲड. नानासाहेब शिंदे यांनी केले. प्रास्ताविक जगन्नाथ घुगरकर यांनी केले. तर पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले.

## खा. लंकेंचा आपत्तीग्रस्तांना दिलासा

दौऱ्यामध्ये महसूल, पाटबंधारे, महावितरण, कृषि व इतर विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते. खडकी येथील नंदू रोकडे यांच्या आठ संकरीत गायांसह संपूर्ण चारा वाहून गेला. पावसाचे पाणी वाढल्याने या कुटूंबातील सदस्यांनी गोठयाच्या छतावर आसरा घेतला. खडकी येथीलच दीपक सयाजी कोठूळे व संतोष कोठूळे या दोघा भावांनी विजेच्या खांबाचा आधार घेत आपले प्राण वाचविले. त्यांची कांदा चाळ, मुरघास, संसार उपयोगी वस्तू, विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य व इतर कागदपत्रे पुराच्या पाण्यात वाहून गेले. ज्योती दीपक कोठूळे व कल्याणी कोठूळे, श्रध्दा कोठूळे यांची ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचा आधार घेत आपले जीव वाचविले. सारोळा कासार येथे रस्ते उखडले असून स्मशानभुमीही वाहून गेली. अकोळनेर येथे तरवडी रोड, सारोळा मार्गे थोरात वस्ती, भोर वस्ती, फणसाचा मळा, जाधववाडी, मेहेत्रे मळा, भोरवाडी रस्ता वाहून गेला.

## लग्न बनले अग्निपरीक्षा नवरी मिळेना नवऱ्याला

या आशेवर प्रत्येक जण आलेल्या स्थळाला प्रतिसाद देत नाही. मुलीकडील नातेवाईकाकडे अनेक स्थळे चालून येत आहेत. यंदा मुलींचे लग्न करायचे आहे का? असी विचारणा केली जात आहे. त्यामुळे मुलीसह माता पित्याची अपेक्षा वाढल्याने लग्न जुळवताना मुलाकडील कुटुंबाला अधिक परिश्रम घ्यावे लागत आहे. तरुणांची निराशा वाढलेली असतानाच लग्नाचे सरासरी वय आणि मुलींच्या आई वडिलांची बदललेली मानसिकता यामुळे दिवसेंदिवस ही समस्या अधिकच गंभीर बनत चालली आहे. लग्नासाठी मुलगी मिळत नाही म्हणून तरुणांचे मानसिक खच्चीकरण होऊ लागले आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# नागरिकांनी कायद्याचे पालन करावे -पो.नि.मुटकुळे

## तिसगाव येथे ग्रामसभा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे गेल्या काही दिवसापासून गोहत्या केली जात असल्याची चर्चा आहे. पोलीस प्रशासन देखील यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्यामुळे तिसगावमध्ये कत्तल खाण्याच्या माध्यमातून गोहत्या करण्याचा प्रयत्न कोणी केल्यास त्याची गय केली जाणार नाही. त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल अशा शब्दात पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तिसगाव येथे झालेल्या ग्रामसभेच्या माध्यमातून कत्तलखाने चालवणाऱ्यांना सूचक इशारा दिला आहे .

तिसगाव येथील महादेव मंदिरासमोर सरपंच मुनिफा शेख यांच्या अध्यक्षतेखाली व माजी सभापती काशिनाथ पाटील लवांडे, ग्रामपंचायतचे सदस्य, विविध पदाधिकारी व ग्रामस्थ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ग्रामसभा पार पडली. यावेळी पोलीस निरीक्षक मुटकुळे ग्रामस्थांना संबोधित करताना म्हणाले, बकरी ईदचा सण जवळ आला आहे. मुस्लिम समाज बांधवांनी हा सण उत्साहात साजरा करावा त्याचबरोबर हिंदूंच्या भावना दुखावणार नाही याची पण काळजी घ्यावी. तिसगावसह तालुक्यात कुठेही गोहत्या करण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. राज्यात गोहत्या



बंदी कायदा असून या कायद्याची सर्वांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कायदा मोडण्याचा प्रयत्न झाल्यास त्याच्या विरोधात मोठी कारवाई केली जाईल.

तिसगाव येथे गुरुवारी याच मुद्द्यावरून काही लोकांनी एका तरुणाला जबर मारहाण केली. त्यामध्ये तो गंभीर जखमी झाला असून पाथर्डी पोलीस स्टेशनला या संदर्भात गुन्हा देखील दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे कोणीही कायदा मोडण्याचा आणि तो हातात घेण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन पोलीस निरीक्षक मुटकुळे यांनी यावेळी केले. माजी सभापती काशिनाथ पाटील लवांडे म्हणाले, गोहत्या करणे मोठे पाप असून कोणीही या पापाचे भागीदार होऊ नये. प्रत्येकाने कायद्याचं पालन करावं व गोहत्या करण्याचा प्रयत्न कोणी केल्यास त्याला कधीही तिसगावकर पाठीशी घालणार नाहीत त्यामुळे कुटुंब चालवण्यासाठी इतर कोणतेही व्यवसाय करा.

यावेळी पाणीपट्टी घरपट्टी रस्ते गावअंतर्गत रस्ते या मुद्द्यावरून देखील ग्रामसभेचे वातावरण चांगलेच तापले होते. गावाला एक एक महिना पाणीच मिळत नाही मग पाणीपट्टी कशी भरणार गावातील ३० टक्के लोकांच्या घर बंगल्याची ग्रामपंचायत दप्तरी नोंद नाही. मग घरपट्टी कशी वसूल करणार असा सवाल उपस्थित करण्यात आला. बकरी ईदला कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत अशा पद्धतीचा उत्सव मुस्लिम समाज बांधव साजरा करून गावाचा व देशाचा एकोपा टिकवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करतील असा विश्वास सामाजिक कार्यकर्ते मन्सूरभाई पठाण यांनी यावेळी व्यक्त केला.

### गोरक्षकांनी कायदा हातात घेवू नये

गोरक्षकांनी देखील कायदा हातात घेऊ नये, गोमातेची अनधिकृतपणे वाहतूक करणारे वाहन पकडले तर त्याची माहिती पोलिसांना द्या, किंवा गावातील गाव प्रमुखांना द्या, कोणीही कायदा हातात घेऊन तिसगावचे वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करू नये, असे आव्हान लवांडे पाटील यांनी यावेळी केले.

## यश भालेकरला कराटे स्पर्धेत ४० सुवर्ण पदके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** देवीभोयरे येथील भारतीय सैन्य दलात नायब सुभेदार या वरिष्ठ पदावर कार्यरत असलेले भरत नारायण भालेकर यांचा सुपुत्र यश भालेकर याने तायक्कांदो या कराटे स्पर्धेत राज्य व देशपातळी वर चमकदार कामगिरी करत ४० सुवर्ण पदके मिळवत देवी भोयरे गावाचे नाव देशपातळीवर चमकवल्याने देवीभोयरे ग्रामस्थांच्या वतीने 'सन्मान भारतमातेच्या सुपुत्राचा' या अनुषंगाने सन्मान करण्यात आला.



देवी भोयरे येथील भारतीय सैन्यदलात नायब सुभेदार या वरिष्ठ पदावर कार्यरत असणारे भरत नारायण भालेकर हे ही सैन्य दलात उत्कृष्ठ सेवा बजावत असताना त्यांचे सुपुत्र यश भरत भालेकर याने तायक्वान्दो या राष्ट्रीय कराटे खेळामध्ये आजपर्यंत ४० सुवर्ण पदके मिळवून देवी भोयरे गावचे नाव देशपातळीवर पोहचले. त्याने अतिशय चमकदार कामगिरी केल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राम स्थांच्या वतीने भव्य नागरी सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सरपंच अशोकराव मुळे, पंचायत समितीचे माजी सदस्य सुभाषराव बेलोटे, जगदंबा पतसंस्थेचे चेअरमन तुकाराम बेलोटे, व्हाईस चेअरमन शिवाजीराव बेलोटे, माजी उपसरपंच संपतराव वाळुंज, सेवानिवृत्त सैनिक सुरेश सरडे, शिवाजी नाना सरडे, भिमाजी मुळे, संपत बेलोटे, सेवा संस्थेचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब बेलोटे, विलास बेलोटे, शिवाजी बाबुराव बेलोटे, व गावातील जेष्ठ मंडळी उपस्थित होते.

## बल्लाळी सागरच्या सरपंचपदी जगताप बिनविरोध



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** तालुक्यातील राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या बल्लाळी सागर ग्राम पंचायतच्या सरपंच पदी लताबाई बाबासाहेब जगताप यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड प्रक्रिया ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर. एम. ससाणे यांनी काम पाहिले. त्यांना सहाय्यक म्हणून कामगार तलाठी तसेच ग्राम विकास अधिकारी यांनी सहकार्य केले. या निवड प्रक्रियेमध्ये वर्षा गौतम जाधव यांनी सरपंचपदासाठी लताबाई जगताप यांच्या नावाची सूचना मांडली. सरपंच पदासाठी जगताप यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी आर. एम. ससाणे यांनी सरपंच म्हणून लताबाई जगताप त्यांच्या नावाची घोषणा केली. जगताप यांच्या निवडीचा गावांमध्ये गुलालाची उधळण व फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष करण्यात आला. या निवडी प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य जिजाबाई दत्तात्रय जगताप, वर्षा गौतम जाधव, शांताबाई फकिरा शिंदे व बाबासाहेब सोपान जगताप, दत्तात्रय जगताप, विष्णु जगताप, शंकर जगताप, पंडित जगताप, बाबासाहेब जगताप, तुषार जगताप, संजय जगताप, काकासाहेब जगताप, सीताराम जगताप, किशोर जगताप, सुदाम जगताप, गणेश जगताप, लक्ष्मण जगताप, संजय जगताप, काशिनाथ जगताप, मच्छिंद्र जाधव उपस्थित होते.

## न्यु इंग्लिश स्कूल पाडळीचा स्नेहमेळावा

### पंचवीस वर्षांनंतर विद्यार्थी आले एकत्र



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील पाडळी येथील हुतात्मा बाबू गेणूसंस्थेचे न्यु, इंग्लिश स्कूलमध्ये नुकताच स्नेहमेळावा पार पडला हा कार्यक्रम तिसगाव येथील हॉटेल माऊली या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मण भापकर होते. तसेच व्यासपीठावर संस्थेचे सचिव कुशल दादा भापसे, शाळेचे मुख्याध्यापक विनायक कचरे, अर्जुन चितळे, कारखेले, मरकड, ढाकणे, गव्हाणे, जिवडे, विठ्ठल चितळे, आमटे, आदी मान्यवर उपस्थित होते. तब्बल पंचवीस वर्षांनंतर सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक हे एकत्र येण्याचा योग स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने झाला.

एवढ्या दिवसांनंतर एकत्र आल्यानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजन व पुष्पहार घालून झाली. यानंतर सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला सर्वच शिक्षकांनी या बॅचचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे तोंडभरून कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## केडगावातील नुकसानीची उपायुक्तांनी केली पाहणी

### भविष्यातील संकट ओळखून उपाययोजना कराव्या - कोतकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** नुकतेच झालेल्या मुसळधार पावसाने केडगावमध्ये पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होवून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. झालेल्या नुकसानीची मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे व माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी पहाणी केली.

मुसळधार पावसामुळे केडगावमध्ये मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे केडगावमध्ये राहत असणाऱ्या काही नागरिकांच्या घरात देखील पाणी शिरले. केडगाव अमरधामची संरक्षण भिंत देखील पावसाने वाहून गेली. देवी रोड वरील आंबेडकर भवनाची भिंतही कोसळली. कांबळे मळा येथील पूल वाहून गेला आहे. झालेल्या नुकसानीची पहाणी करुन तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनाने माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्याशी संपर्क साधून त्यांना पाहणी करण्यासाठी बोलावून घेतले.



यावेळी नुकसान झालेल्या भागाची पाहणी करण्यात आली.

मनोज कोतकर यांनी मुसळधार पावसाने केडगावमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मनपा प्रशासनाच्या माध्यमातून तातडीने समस्या सोडविण्यासाठी व उपाययोजना करण्यासंदर्भात पाठपुरावा सुरु आहे. लवकरच मान्सून सक्रीय होणार असून, भविष्यातील संकट ओळखून उपाययोजना कराव्या. लवकरच अमरधामची भिंत बांधली जाणार असून, नागरिकांनी देखील घाबरुन न जाता, मनपा प्रशासन त्यांच्या पाठिशी असल्याचे भावना व्यक्त केली. तर नागरिकांना देखील नुकसान भरपाई मिळण्याची मागणी त्यांनी केली. उपायुक्त मुंडे यांनी झालेल्या नुकसानी संदर्भात तातडीने ठोस पाऊले उचलून उपाययोजना केल्या जाणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी शरद ठुबे, सुमित लोंढे, सोनु बापू घेबूड, बाला कोतकर, ऋषी गवळी, शुभम लोंढे, भाऊ गुंड आदी उपस्थित होते.

## तलाठी कार्यालयाच्या जागेची मोजणी करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील तलाठी व मंडल कार्यालयाची जागा पाच गुंठे असुन या जागेची मोजणी करुन या जागेतील अतिक्रमण हटविण्याबाबत अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने येथील तरुणांनी तिव्र संताप व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. पाथर्डी तालुक्यातील करंजी हे कल्याण-निर्मळ महामार्गावरील मोठे गाव आहे. येथील तलाठी व मंडल कार्यालयासाठी नविन इमारतही मंजुर झालेली आहे. येथील तलाठी व मंडल कार्यालयाची पाच गुंठे जागा असल्याचा १९८६ साली प्रांताधिकारी यांनी हुकुमही काढलेला. त्यामुळे सात बारा उताऱ्यावर शासनाची नोंद असलेल्या जागेची मोजणी करुन घ्यावी, यासाठी येथील तक्षशिला ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी तहसिलसमोर उपोषण केले होते. परंतु तहसिलदार डॉ नाईक यांनी आश्वासन नव्हे तर आपण या जागेची मोजणी करण्या बाबत भुमि अभिलेख कार्यालयास पत्र दिल्याचे सांगितले.पंधरा दिवस उलटुन गेले मात्र, अद्यापही संबंधित विभागाकडुन कोणतीच कारवाई झाली नसल्याने तक्षशिला ट्रस्टच्या कार्यकर्त्यांत तिव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. येत्या आठ दिवसात तलाठी व मंडल कार्यालयाच्या जागेची मोजणी न झाल्यास तिव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा माजी सरपंच नवनाथ आरोळे, बाबाजी मोरे,अझहर पठाण, तक्षशिला ट्रस्टचे अध्यक्ष विश्वास क्षेत्रे ,सुधीर आरोळे, धर्मा क्षेत्रे, लाजरस क्षेत्रे, कैलास क्षेत्रे, संदीप क्षेत्रे, आकाश क्षेत्रे,तुषार क्षेत्रे आदी कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## बाभळेश्वर येथे म्हसोबा महाराज यात्रेचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बाभळेश्वर :** राहाता तालुक्यातील बाभळेश्वर येथील श्रीरामपूर जिल्हा दूध संघासमोरील म्हसोबा महाराज मित्र मंडळ बेंद्रे वस्ती यांच्यावतीने जागृत देवस्थान म्हसोबा महाराज यात्रा उत्सवाचे आयोजन शनिवार दि. ३१ मे रोजी करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने सकाळी पुणतांबा येथून आणलेल्या कावडीच्या पाण्याची मिरवणूक तसेच मानाच्या काठीची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर ७वाजता म्हसोबा महाराज मूर्ती अभिषेक होईल. रात्री केली जाणारी भव्यदिव्य आतषबाजी खास आकर्षण असते. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी यात्रेनिमित्ताने आयोजित केलेल्या धार्मिक कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन म्हसोबा महाराज मित्रमंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल सर्वसामान्यांसाठी आरोग्यदूत

### डॉ. प्रवीण मुनोत ;शस्त्रक्रिया शिबिरातंर्गत रुग्णांची तपासणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** मागील दोन दशकापासून आनंदऋषीजी हॉस्पिटल सर्वसामान्यांसाठी आरोग्यदूत ठरला आहे. खर्चिक व अद्यावत सर्व आरोग्य सुविधा सर्वसामान्यांना एकाच छताखाली उपलब्ध झाली आहे. १०० बेड पासून दुमजली इमारतीपासून सुरू झालेला हा प्रवास बहुमजली इमारतीसह दुपटीने बेडची संख्या आणि अद्यावत ऑपरेशन थिएटरद्वारे सर्वसामान्यांना आरोग्य सेवा दिली जात असल्याचे प्रतिपादन जनरल





सर्जन डॉ. प्रवीण मुनोत यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित जनरल शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सेवा देणारे डॉ. मुनोत बोलत होते. याप्रसंगी डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, अभय गुगळे, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, डॉ. विवेक भापकर आदी उपस्थित होते.जनरल शस्त्रक्रिया शिबिरात डॉ. प्रवीण मुनोत व डॉ. विवेक भापकर यांनी ८० रुग्णांची तपासणी केली. गरजेनूसार रुग्णांवर अपेंडिक्स, इगवायनल हर्निया, हायड्रोसिल आदी जनरल शस्त्रक्रिया अल्पदरात केल्या जाणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.डॉ. मुनोत म्हणाले की, आनंदऋषीजीचे ऑपरेशन थिएटर प्रशस्त, सुसज्ज व अद्यावत असून, एकाच वेळी ५ ऑपरेशन होऊ शकतात. यामध्ये हृदयरोग वेगळे असून, एन्जोप्लास्टीसाठी वेगळी कॅथलॅब उपलब्ध करण्यात आलेली आहे. दर महिन्याला मोठ्या प्रमाणात यशस्वी शस्त्रक्रिया होत असल्याचे स्पष्ट करुन, त्यांनी हॉस्पिटल स्थापनेपासूनचा सुसज्ज हॉस्पिटल पर्यंतचा अनुभव विशद केला.

## विद्यार्थ्यांची दाखल्यासाठी होतेय पळापळ; थोरात यांचा तत्कालीन निर्णय पडद्याआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** दहावी व बारावीच्या निकालानंतर सर्व विद्यार्थी व पालकांची विविध दाखले काढण्यासाठी सध्या मोठी तारांबळ उडत आहे.

काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी विद्यार्थ्यांना सर्व दाखले शाळेतच देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. सध्या मात्र दाखले शाळेत मिळत नसल्याने विद्यार्थी व पालकांची मोठी पळापळ होत आहे. थोरात यांचा निर्णय अत्यंत चांगला होता, अशी भावना पालकांमधून उमटत आहे. यावर्षी मे महिन्यातच दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर झाला आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विविध दाखल्यांची आवश्यकता असून हे दाखले मिळवण्यासाठी तहसील कार्यालय व इतर ठिकाणी विद्यार्थी व पालकांची मोठी गर्दी आहे.

विद्यार्थ्यांना सर्व दाखले शाळेतच मिळावे याकरता तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी २०१३ मध्ये विद्यार्थ्यांना शाळेतच सर्व दाखले देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. त्यानुसार उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेअर, डोमिसाईल यांसह लागणारे सर्व दाखले शाळेतच मिळाल्याने विद्यार्थ्यांची व पालकांची सर्व गैरसोय टळली होती. २०१३ मध्ये ८० लाख दाखले विद्यार्थ्यांना शाळेत दिले गेल्याने त्याची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दाखले मिळवण्यासाठी संगमनेरला यावे लागत आहे. येथे येऊनही दाखले लवकर मिळत नाहीत. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळातील शाळेत दाखले देण्याची व्यवस्था पुन्हा राबवावी, अशी मागणी देवकौठे येथील राजेंद्र कहांडळ यांनी केली आहे.

सरकारबरोबरच अनेक निर्णय बदलले. सध्या शाळेत दाखले मिळत नसल्याने विद्यार्थ्यांना विशेषतः विद्यार्थिनींना खेडेगावातून येऊन दाखल्यांसाठी दिवस दिवस रांगेत उभे राहावे लागत आहे. त्यातच अकरावीचे प्रवेश ऑनलाईन झाल्याने या विद्यार्थ्यांची मोठी अडचण झाली आहे. सर्व्हर बंद पडत असल्यानेही अडथळे येत आहेत. प्रवेश प्रक्रिया सुरू नाही. दाखले वेळेत मिळत नाही. अकरावी प्रवेशासाठी धोरण निश्चित नाही. अशावेळी विद्यार्थी व पालकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे थोरात यांनी विद्यार्थ्यांच्या हिताकरता राबवलेल्या निर्णयाची पुन्हा अंमलबजावणी करण्याची मागणी सर्वत्र होत आहे.

### थोरातांच्या कार्यकाळात चांगल्या सुविधा

माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे ग्रामीण भागातील व शेतकऱ्यांचे प्रश्न जाणणारे नेते आहेत. त्यांना विद्यार्थ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्य अडचणी माहिती आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांसाठी त्यांनी सुरू केलेल्या सुविधा परत सुरु कराव्यात अशी मागणी ज्योतीताई अण्णासाहेब शेवकर यांनी केली आहे.

# मनपा आयुक्तांसह अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

## निलंबित वैद्यकिय अधिकारी बोरगे यांची एसपींकडे निवेदनाद्वारे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महानगर-पालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त विजयकुमार मुढे, मुख्य लेखा परिक्षक विशाल पवार, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. सतिष राजुरकर यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निलंबित वैदयकिय अधिकारी अनिल बोरगे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

बोरगे यांनी निवेदनात म्हटले की, अहिल्यानगर महानगरपालिका येथे वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन दि. ९ मार्च २०१० पासून कार्यरत आहे. त्या करीता नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या ९ मार्च २०१० व २० एप्रिल २०१६ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे माझी सदर पदावर नियुक्ती झालेली आहे. मी सदर पदावर अत्यंत इमाने इतबारे संपूर्ण माझे कौशल्य वापरुन माझ्या नियुक्तीप्रमाणे पूर्ण निष्ठेने माझे कर्तव्य पार पाडीत आहे.

परंतु महानगरपालिका आयुक्त व इतरांनी माझ्या विरोधात मनात राग ठेवून केवळ मी अनुसुचित जातीचा आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्य अधिकाऱ्यांच्या रँकिंगमध्ये मी या पूर्वीच २६ व्या क्रमांकावरुन १६ व्या क्रमांकावर आलेलो आहे. त्या करीता मी अनेक कष्ट करुन सेवा देऊन सदरची श्रेणी प्राप्त केलेली आहे. याची जाणीव व कौतुक न करता व माझ्याबद्दल अनुसूचित जातीचा असल्याचा मनात राग धरुन मला आयुक्त यशवंत डांगे यांनी त्यांचे पत्र जा.क्र. १०७ दि. ७ जानेवारी २०२५ नुसार विनाकारण माझ्या विरुध्द कोणतेही सबळ पुरावे नसतांना व तसेच आवश्यक त्या नियमाप्रमाणे कारवाई न करता मन मर्जीने मला सक्तीच्या



रजेवर पाठविले आहे. त्याबाबत मी तारीख ७ जानेवारी २०२५ व ९ जानेवारी २०२५ रोजी आयुक्त डांगे यांनी मला माझ्या पदावर नियमाप्रमाणे काम करुन देण्याबाबत विनंती करुनही मला त्यांनी माझ्या पदावर काम करु दिले नाही.

मला विनाकारण बेकायदेशिररित्या सक्तीच्या रजेवर जाण्यास भाग पाडलेले आहे. सदरचे सक्तीच्या रजे बाबतचा आदेश रद्द करण्यासाठी मी प्रधान सचिव नगर विकास विभाग यांना लेखी अर्ज केलेला आहे. त्याबाबत मा. प्रधान सचिव यांनी अहिल्यानगर महानगर पालिका आयुक्त यांच्याकडून ३० जानेवारी २०२५ रोजीच्या पत्राने लेखी खुलाशाची मागणी केलेली आहे. असे असताना सदर आयुक्त यांनी आवश्यक ते कायदेशिर व नियमा प्रमाणे कार्यवाही करण्या ऐवजी माझ्या विरुध्द वैयक्तीक द्वेशातून १६ जानेवारी २०२५ रोजीच्या जा क्र. २६४ नुसार एक बेकायदेशिर समिती नेमली. त्यामध्ये वर विषयात नमूद केलेल्या इसमांचा सामावेश केलेला आहे.

त्यामुळे सदरील आरोपींनी अक्षम्य असा गुन्हा केलेला असून त्यांच्या विरुध्द तातडीने योग्य ती जास्तीत जास्त कडक कायदेशिर कारवाई करण्यात यावी व मला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निलंबित मनपा आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# ... अखेर शिक्षक भारतीच्या पाठपुराव्याला यश

## राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला आणि पगार बंदीला स्थगिती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : राज्यातील सर्व अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला शासनाने तूर्त स्थगिती दिली आहे. जिल्हा परिषदेच्या संदर्भात न्यायालयीन आदेश झाल्यानंतरही समायोजनाची प्रक्रिया सुरू होती. समायोजनास नकार दिलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे पगारही थांबवण्यात आले होते. याबद्दल शिक्षण संचालक यांनी संचमान्यता, समायोजन आणि पगार बंदीला स्थगिती देण्याचे स्पष्ट आदेश जारी केले आहेत. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

> समायोजनाची सगळीच प्रक्रिया थांबवण्यात आले आहे. कोर्टाच्या निर्णयाची अवमान होणार नाही, याबद्दल आदेश देण्यात आले आहेत. मुंबईतील शिक्षकांना मुंबई बाहेर अतिरिक्त करणे आणि वेतन स्थगिती या दोन्ही प्रक्रिया यामुळे तूर्त थांबतील.
>
> **– डॉ. महेश पालकर, शिक्षण संचालक**

यासंदर्भात माजी आ. कपिल पाटील, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे आणि कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांची भेट घेऊन, न्यायालयीन आदेशानंतरही समायोजन प्रक्रिया सुरू असल्याचे, पगार थांबवण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले.

आरटीई कायद्यातील तरतुदी आणि महाराष्ट्र राज्य सेवा शर्ती नियमावली १९८१ यांच्याशी विसंगत १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय असल्याचेही लक्षात आणून दिले होते. त्यानंतर आता शासनाने संचमान्यता आणि समायोजन प्रक्रिया थांबवल्याचे जाहीर केले आहे.

शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संबधीत आदेश मुंबईसह लागू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शेकडो शिक्षकांचे पगार बंदीचे संकट तूर्तास दूर झाले आहे. याबद्दल सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव आणि शिक्षण संचालक यांचे आभार मानले आहेत.

# साई भक्तांची गुणवंत विद्यार्थ्यांवर कौतुकाची थाप

## दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : साई भक्त परिवार यांच्या वतीने इयत्ता दहावी व बारावीमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाला दाद देत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साई भक्त सौ.आशा विजय रहाणे होत्या. यावेळी रशमी रहाणे, मनिषा दरेकर, जयश्री नेहे, मोनिका सरवार तसेच पालकवर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे गुणवंत विद्यार्थ्यांना साईबाबांची प्रतिमा तसेच साईबाबांची शाल व पेन देऊन सन्मान करण्यात आला

गौरविण्यात आलेले विद्यार्थी: वैष्णवी लहानु रहाणे ८८.६० टक्के, साहील सोपान गव्हाणे ८६.२० टक्के, सिध्दी संदिप रहाणे ७६ टक्के, प्रियदर्शनी महेश देशमुख ७६ टक्के, विवेक नंदु शेलार ६८ %, मयुरी अरूण शेजवळ – ६५%, प्रियंका गोपीनाथ गव्हाणे



– ८२%, पुनम शरद गव्हाणे – ७५ %, श्रद्धा रावसाहेब मोराडे – ६६%

विद्यार्थ्यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करत मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. साई भक्तांनी त्यांच्या मेहनतीचे कौतुक करत त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले.

या सोहळ्याला ह.भ.प.विजय महाराज रहाणे,भाऊसाहेब ( भाऊ ) रहाणे,राजेंद्र नेहे,साईराम महाराज रहाणे आणि साई भक्त उपस्थित राहुन कार्यक्रम अधिकच संस्मरणीय केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल साईभक्त महिला यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# उंबरकर परिवाराने गावाला दिला नवीन पायंडा

## लग्न सोहळ्याच्या अतिरीक्ति खर्चाला फाटा देत मंदीरांसाठी आर्थिक मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : लग्नाच्या अतिरीक्ति खर्चाला फाटा देत संगमनेर तालुक्यातील उंबरीबाळापुर येथील साजाजिक कार्यकर्ते सोमनाथ उंबरकर यांनी गावातील विविध मंदीरासाठी आर्थीक मदत दिली. त्याच बरोबर भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी रोख स्वरुपाची ११ हजार रूपये देणगी स्मारक समिती तर्फे संपतराजे भुसाळ यांनी स्वीकारली.

नुकताच उंबरीबाळापुर येथील साजाजिक कार्यकर्ते सोमनाथ उंबरकर यांची पुतणी व प्रगतशिल शेतकरी रामनाथ उंबरकर यांची सुकन्या मृदुला व अर्जुन म्हतारबा

> उंबरकर परीवाराने लग्नात येणारा अतिरीक्त खर्च टाळून गावातील मंदिराना देणगी दिली. उंबरीबाळापुर गावामध्ये हा नविन पायंडा सुर झाला असुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी रोख ११ हजार रूपये दिले. याबद्दल स्मारक समितीकडुन त्यांचा सन्मान करण्यात आला. **– संपतराजे भुसाळ**



हिंगणे यांचे चिंरजीव विक्रम यांचा शुभविवाह संपन्न झाला.

या शुभविवाहात सामाजिक शौक्षणिक तसेच राजकिय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी लग्नात उपस्थित मान्यवराचा सत्कार करण्याऐवजी उंबरीबाळापुर गावातील मंदिराना रोख स्वरुपाची आर्थिक मदत उंबरकर परिवाराकडून करण्यात आली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, मारूती मंदीर, विठ्ठल मंदिर, मांदनी आई मंदिर आदीना रोख स्वरूपात देणगी देण्यात आली. त्याचबरोबर संत शिरोमणी सावता महाराज मंदिराच्या रंगकाम करण्यासाठी येणार सर्व खर्च सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ उंबरकर करणार असल्याने संत शिरोमणी सावता महाराज मंदिर समितीच्या वतिने सुरेश थोरात यांनी सोमनाथ उंबरकर आभार व्यक्त केले.

# जादा दराने बियाणे विक्री करणे भोवले; दुकानावर छापा

## कृषी विभागाची कारवाई; शेतकऱ्यांची फसवणूक उघडकीस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यात कपाशी बियाण्यांची जादा दराने विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या पाथर्डी शहरातील उपजिल्हा रुग्णालयासमोरील तारकेश्वर कृषी विकास भांडार या कृषी सेवा केंद्रावर कृषी विभाग आणि पोलीस प्रशासनाने गुरुवारी संयुक्त कारवाई केली. या प्रकरणी दुकानदार देविदास आनंदराव फुंदे यांच्यावर विविध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाथर्डी पंचायत समितीचे कृषी अधिकारी गौतम हरिभाऊ फाजगे यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, जिल्हा गुणवत्ता निरीक्षक राहुल ढगे यांना शेतकऱ्यांकडून कपाशी बियाण्यांची जादा दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी मिळाल्या. या अनुषंगाने तपास करत असताना फुंदे यांच्या दुकानात एसडब्लूसीएच (७०६७) हे शीडवर्क कंपनीचे वाण अकराशे रुपये दराने आणि महिको कंपनीचे एमआरसी ७३९१ (बाउन्सर) वाण बाराशे ते तेराशे रुपये दराने विकले जात असल्याचे आढळले.

त्यानंतर डमी ग्राहक पाठवून केलेल्या खरेदीत हे बियाणे जादा दराने विक्री करत असल्याची खात्री झाली. खरेदीचे बिल, रोख रक्कम व



बियाणे पाकिट पंचांसमक्ष जप्त करण्यात आले. अधिक चौकशीत असेही आढळले की संबंधित दुकानाकडे कपाशी बियाण्याचा विक्री परवाना नाही.

> **... त्यामुळेच शेतकरी अडचणीत**
>
> सदरील घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे. वाढती बियाण्यांची किंमत आणि खोट्या वाणांची विक्री यामुळे आधीच आर्थिक संकटात असलेले शेतकरी अजून अडचणीत येतात. कृषी विभागाने अशा दुकानांवर कठोर कारवाई करत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

> **आता विक्रीत पारदर्शकता राहणार**
>
> कृषी विभागाने विक्री बंदी आदेश काढून संबंधित बियाण्यांचा साठा जप्त केला आहे. या प्रकारामुळे इतर दुकानदारांनाही इशारा मिळेल आणि बियाणे विक्रीत पारदर्शकता राहील, असा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत.

तसेच खरेदी बिलाऐवजी केवळ डिलिव्हरी चलन सादर करण्यात आले आणि साठा नोंदी अपूर्ण होत्या. विविध कलमा अन्वे हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक भगवान गरगडे, संदीप कळम कर यांनी कारवाई साठी कृषी विभागाला मदत केली.

# नेवासाचा पालखी सोहळा ऐतिहासिक ठरणार

## देविदास महाराज म्हस्के; आषाढीच्या पूर्वसंध्येला श्री संत ज्ञानेश्वरी पालखी सोहळा प्रस्थान करणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : संत ज्ञानोबा माऊलींचा ७५० वा जन्मोत्सवी वर्षामध्ये सुरू होणाऱ्या ऐतिहासिक ज्ञानेश्वरी पालखी सोहळामध्ये दिंड्यांनी आणि वारकऱ्यांनी नियमां चे पालन करीत आनंद घ्यावा असे आवाहन ज्ञानेश्वर मंदिराचे देविदास महाराज म्हस्के यांनी केले

संत ज्ञानेश्वर महाराजांचे कर्मभूमी आणि ज्ञानेश्वरी



> ज्ञानोबांच्याच संकल्पनेतून या नव्या पालखी सोहळ्याचा प्रारंभ होत आहे. श्रीक्षेत्र नेवासा हे ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असून, येथून निघणारा पालखी सोहळा भाविकांसाठी एक ऐतिहासिक पर्वणी ठरणार आहे.
>
> **– रामभाऊ महाराज राऊत**

> ज्ञानेश्वरीची पायाभरणी ज्याठिकाणी झाली. त्या श्रीक्षेत्र नेवासातून यंदा प्रथमच पालखी प्रस्थान ठेवणार आहे. यंदा संत ज्ञानोबा माऊलींचा ७५० वा जन्मोत्सव असल्याने हा ऐतिहासिक सोहळा सुरू होतो आहे.
>
> **– देविदास महाराज म्हस्के**

लिखाणाचे स्थान असलेल्या श्रीक्षेत्र नेवासा येथून यंदा प्रथमच आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला श्री संत ज्ञानेश्वरी पालखी सोहळा प्रस्थान करणार आहे. देहू, आळंदी आणि त्र्यंबकेश्वरप्रमाणेच आता नेवासातूनही पालखी प्रस्थान होणार असून, यासंदर्भातील अंतिम नियोजन बैठक विठ्ठल आश्रम, गंगापूर येथे रामभाऊ महाराज राऊत आणि ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

या बैठकीत पालखी मार्ग, मुक्कामाची ठिकाणं, कीर्तन-भजनाचे वेळापत्रक, नियमावली यांची माहिती देण्यात आली. माऊली मंदिराच्या सभामंडपात पार पडलेल्या या नियोजन बैठकीस अनेक संत मंडळी व दिंडी चालक उपस्थित होते.

या पालखी सोहळ्यात नेवासा व परिसरातील ३० ते ४० दिंड्या आणि अंदाजे २५ ते ३० हजार भाविक सहभागी होणार आहेत. १९ जून रोजी नेवासा येथून प्रस्थान होणार असून, पहिला मुक्काम नेवासातच होईल. त्यानंतर दररोज साधारण २० किमीचा प्रवास करत आषाढी अष्टमीला पालखी पंढरपूरला पोहोचेल. नवमीला नगरप्रदक्षिणा होऊन भाविक पांडुरंगाच्या सेवेत मग्न होतील.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने दिंड्यांना क्रमांक देऊन नियमावली जाहीर करण्यात आली आहे. संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, विश्वस्त, दिंडी चालक, वारकरी या बैठकीस उपस्थित होते. आभार कैलास जाधव यांनी मानले.

# वांगदरी विद्यालयात २५ वर्षांनी रंगला शाळकरी आठवणींचा स्नेहमेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : कालचा वर्ग, आजचा परिवार! अशी भावना मनात साठवत, वांगदरी विद्यालयाच्या इयत्ता दहावी २००१ च्या बॅचचा स्नेहमेळावा तब्बल पंचवीस वर्षांनंतर उत्साहात आणि भावनांनी भारलेल्या वातावरणात पार पडला. दि. २५ मे रोजी यवत जवळील निसर्गरम्य 'मेहेर रिट्रीट ॲग्रो टुरिझम' या ठिकाणी जुन्या मित्र-मैत्रिणींचा पुन्हा एकत्र येण्याचा सोहळा रंगला.

जवळपास ३६ माजी विद्यार्थी, ज्यात २१ मुले व १५ मुली सहभागी झाल्या होत्या, त्यांनी आपली व्यस्त जीवनरेषा थांबवून या खास क्षणासाठी उपस्थिती लावली. अवकाळी पावसाच्या सरी पडत असतानाही जुन्या मित्रांना भेटण्याच्या ओढीपोटी कोणाच्याच पायांना लगाम लागला नाही.

या स्नेहमेळाव्याचे संयोजन गणेश नागवडे, अविनाश जगताप, संतोष सोनवणे, गीतांजली पवार आणि कविता गायकवाड या माजी विद्यार्थ्यांनी हिरीरीने केले. त्यांनी आठवणींच्या या गोफात प्रेमाचे धागे मिसळत मनमिळावूपणाचा झंकार घडवून आणला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व उपस्थितांनी आपापला पंचवीस वर्षांचा जीवनप्रवास थोडक्यात कथन करत अनुभवांची शिदोरी उलगडली. शालेय आठवणी, बालमित्रांच्या गमतीजमती, शिक्षकांचे मार्गदर्शन यांचे सूर जणू पुन्हा एकदा हृदयात गुंजले. गप्पागोष्टी, फोटोसेशन्स आणि हास्यविनोदांनी दिवस कसा गेला ते कळलेही नाही.

या स्नेहमेळाव्याने सर्वांच्या मनात नात्यांची उब पुन्हा जागवली, आणि जुने दिवस नव्याने अनुभवण्याचा एक अविस्मरणीय क्षण देऊन गेला अशी भावना प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगताकरताना, गणेश नागवडे यांनी सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले आणि पुढील स्नेहमेळाव्यासाठी अधिक उत्साहाने एकत्र येण्याचे आवाहन केले.

# युवा धोरण समितीत आ. सत्यजित तांबेंची वर्णी

## राज्यातील युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम धोरणाची आवश्यकता : आ. तांबे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्याच्या नवीन युवा धोरणासंदर्भात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र राज्यात युवा धोरण, २०१२ च्या आधारे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी एक नवीन समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये नाशिक पदवीधर मतदार संघाचे आ. सत्यजित तांबे यांचा समावेश करण्यात आला आहे.

या संदर्भातील शासन निर्णय २८ मे, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून

> **भविष्य उज्ज्वल बनवण्याचे धोरण**
>
> या समितीला राज्याच्या युवकांचे भविष्य उज्ज्वल बनवण्यासाठी एक मजबूत आणि सर्वसमावेशक धोरण तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. हे नवीन धोरण युवकांना शिक्षण, रोजगार, क्रीडा, कौशल्य विकास आणि सामाजिक सहभागाच्या संधी उपलब्ध करून देण्यास मदत करेल.

राज्याच्या युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी एक सक्षम धोरणाची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण, २०१२ हे धोरण जाहीर केले होते. मात्र, १० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटल्याने, हे धोरण सध्याच्या गरजांनुसार अपुरे पडू लागले होते. त्यामुळे, राज्याच्या युवा धोरणामध्ये सुधारणा करून नवीन धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

नवीन धोरणाच्या निर्मितीसाठी आणि जुन्या धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी शासनाने एक उच्चस्तरीय समिती नेमली आहे. या समितीमध्ये अनुभवी मंत्री, अधिकारी आणि तज्ञांचा समावेश असून समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी



राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांच्यावर सोपविण्यात आले आहे.

समितीमधील अन्य सदस्यांमध्ये विधान परिषद सदस्य सत्यजित तांबे, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी यांच्यासह विधानसभा सदस्य संतोष दानवे, राजेश पवार, आशुतोष काळे यांच्यासह क्रीडा विभागाचे अपर सचिव, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचा १ प्रतिनिधी (उपसचिव/संचालक/ आयुक्त/ सहसंचालक किंवा यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नवोपक्रम विभागाचे १ प्रतिनिधी (उपसचिव/संचालक/ आयुक्त/ सहसंचालक किंवा यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी) यांचा समावेश करण्यात आला आहे.

> **युवकांबद्दल केलेल्या कार्याचे फलित**
>
> ही समिती येत्या तीन महिन्यात सूचना आणि शिफारसींचा विचार करून नवीन युवा धोरणाचा मसुदा तयार करेल. हे नवीन धोरण राज्याच्या विकासात महत्त्वाचे योगदान देईल आणि युवकांना आत्मनिर्भर बनण्यास मदत करेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. सरकार नियुक्त समितीमध्ये अपक्ष आ. तांबे यांनी युवकांशी संबंधित केलेले कार्य लक्षात घेता त्यांना संधी देण्यात आल्याने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# कार पार्कींगसाठी आताच काम करणे आवश्यक : निलेश साळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो. अहील्यानगर आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ॲडव्हान्स ट्रेनिंग ऑन मल्टीलेव्हल कार पार्किंग सिस्टिम या विषयावर पुण्यातील एनएनआयटी कार पार्किंग सिस्टीम प्रा. लि.चे निलेश साळी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

अहिल्यानगरमध्ये आता बहु मजली इमारतीचे बांधकाम मोठ्या प्रमाणात वाढले असून तळमजले पार्कींगसाठी कमी पडत आहेत. बिल्डर यांना प्रत्येक फ्लॅट धारकाला कार पार्किंग देणे गरजेचे झाले आहे. ग्राहकाला नजरेपुढे ठेऊन यासाठी विवध पर्याय वापरणे आता गरजेचे झाले असून त्या अनुषंगाने पुण्यातील या क्षेत्रातील तज्ज्ञ निलेश साळी यांच्या व्याख्यानाचे संस्था सभासदांसाठी आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये कस्टमाइज डिझाइन, जागेचा पार्कींग साठी योग्य वापर, पैश्यांची बचत, सुरक्षितता, ट्रॅफिक, वेळेची बचत आणि वर लिफ्टमधील सुरक्षितता याचा विचार करून कार पार्किंगचे डिझाइन आणि काम केले जाते. एनएनआयटी कार पार्किंग सिस्टिम मध्ये टू लेव्हल डीपेंडांट स्टॅक पार्कींग, थ्री लेव्हल इनडीपेंडांट पिट पार्कींग पझल सिस्टिम, टॉवर पार्किंग सिस्टिम, टू लेव्हल इनडीपेंडांट स्टॅक पार्कींग, थ्री लेव्हल डीपेंडांट स्टॅक पार्कींग, थ्री लेव्हल बॅक टू बॅक पझल पार्किंग सिस्टिम, हॉरी झोंटल सर्क्युलेशन पझल पार्किंग सिस्टिम कांटिलिव्हर डीपेंडांट स्टॅक पार्कींग अश्या विविध प्रकारच्या सिस्टिम निलेश साळी यांनी जागा आणि विकसक यांची गरज याप्रमाणे डिझाईन केल्या आहेत.

# अकोले तालुक्याला अवकाळीचा फटका; एकाचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अवकाळीच्या मुक्तहस्त बरसण्यामुळे तालुक्यातील पश्चिम आदिवासी भाग, प्रवरा-मुळा-आढळा खोऱ्यात शेती पिकांसह घरांचे नुकसान झाले. नुकसानीचे पंचनामे करून भरपाईची मागणी होत आहे. शेतात काढून साठवलेला कांदा, टोमॅटो, वालवड, भाजीपाला भुईमूग, बाजरीसह उन्हाळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुक्यातील ९ गावांमध्ये ५४ घरांची पडझड झाली, ६ गावांमधील घरांवरील पत्रे उडाले, मुथाळणे येथे वीज पडून तीन जनावरे दगावली तर कळस येथे झाड अंगावर पडून एकाचा मृत्यू झाला.

अकोले तालुक्यात नऊ ते दहा दिवसांत जवळपास बाराशे मिलीमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. आदिवासी भागात गेल्या

## तीन जनावरे दगावली; घरांची पडझड

काही वर्षांत उन्हाळ बाजरी पीक घेण्यात येते. काढणीला आलेली बाजरी, पोहळी करून शेतात साठवलेला कांदा, टोमॅटो, भुईमूग आदी पिकांचे नुकसान झाले. अकोले १०, विरगाव १८, राजूर ५, लिंगदेव ४, खिरविर २, रुंभोडी ५, साकीरवाडी ३, कोतुळ १ व ब्राम्हणवाडा ६ अशी ९ गावांत ५४ घरांना अवकाळीचा फटका बसला आहे. सहा गावांमधील घरांवरील पत्रे उडाले, भिंतींच्या पडझडीमुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. टोमॅटोवर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. आढळा धरणाच्या लाभक्षेत्रात आठमाही बागायती शिवारात भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांची



मोठी हानी झाली आहे.

अकोले मंडळात २६१ हेक्टर, राजूर मंडळात ३३ हेक्टर, कोतुळ मंडळात १.२० हेक्टर, समशेरपूर मंडळात ४८४ हेक्टर अशा एकूण ४ मंडळात सुमारे ७७८ हेक्टर क्षेत्रात टोमॅटो, भुईमूग, भाजीपाला, बाजरीसह उन्हाळी धान पिकांचे नुकसान झाले आहे. आमदार डॉ. किरण लहामटे यांनी बांधावर जाऊन, नुकसानीची पाहणी केली. दरम्यान, तालुका कृषी व तलाठी संयुक्तपणे नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करून, पंचनामे करीत आहेत.

> वरिष्ठांच्या सूचनेनुसार अवकाळीच्या नुकसानीचे पंचनामे सुरू आहेत. वीज पडून दगावलेली तीन जनावरे व अंगावर झाड पडून मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबास लवकरच शासकीय मदत दिली जाणार आहे.
>
> **-किसन लोहरे, निवासी नायब तहसीलदार**

> प्राथमिक अहवालातून ४७६ हेक्टर क्षेत्र पीक नुकसान आहे. नुकसानीची पाहणी करून, पंचनामे करण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी, सहायक ही ग्रामस्तरीय समिती कार्यरत आहे. उन्हाळी भुईमुगाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी टोल क्रमांक १४४७किंवा अकोले तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.
>
> **-सचिन. गिरी, तालुका कृषी अधिकारी**



## खेळाडूंसाठी १० दिवसीय प्रशिक्षण शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, अहिल्यानगर यांच्यामार्फत ८ ते १४ वयोगटातील तसेच वरिष्ठ गटातील खेळाडूंसाठी प्राथमिक व अद्यावत प्रशिक्षण शिबीराचे १ ते १० जुन २०२५ या कालावधीत सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक खेळाडूंनी या शिबीरात सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे. जिल्ह्यात खेळाचा अधिक प्रमाणात प्रचार, प्रसार होऊन गावपातळीपासून चांगले खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी या प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. खो-खो खेळाचे शिबीर एकलव्य क्रीडामंडळ, निर्मलनगर, अहिल्यानगर व बाबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर, शेवगाव येथे होणार असून बॅडमिंटन व कुस्ती या खेळाचे प्रशिक्षण शिबीर जिल्हा क्रीडा संकुल, वाडियापार्क, अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्रीय कसोट्या उपलब्ध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : इयत्ता दहावी व बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर येथे मानसशास्त्रीय कसोट्या उपलब्ध करुन देण्यात आल्या असून आतापर्यंत १९० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धीक क्षमता, अभिरुची, व्यक्तीमत्व आणि करिअर निवडीसाठी योग्य मार्गदर्शन करणे हा या कसोट्यांचा मुख्य उद्देश आहे. ही सेव नि:शुल्क असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी पत्त्यावर संपर्क साधावा अथवा संकेतस्थळास भेट द्यावी, असेही कळविण्यात आले आहे. कोल्हार उपबाजारात गहू २६११ रुपये कोल्हार - राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक येथील उपबाजारात गुरुवारी गव्हाची २१ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २५०० रुपये तर जास्तीत जास्त २६११ रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. तसेच कोल्हार उपबजारात सोयाबीनची १ क्विंटल आवक झाली. सोयाबीन ४२०० रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. मक्याची १ क्विंटल आवक झाली. मका २२०० रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

## वाढदिवसानिमित्त रुग्णालयात फळांचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : माजी मंत्री शंकरराव गडाख यांचा वाढदिवस सोनई (ता. नेवासा) येथे हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला. गडाख यांचे अभीष्टचिंतन करण्यासाठी दिवसभर कार्यकर्त्यांची गर्दी होती.

वांजोळी (ता. नेवासा) येथे शंकरराव गडाख मित्रमंडळाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव उपबाजार येथेही संचालक मंडळाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी डॉ. बाबासाहेब शिरसाठ यांनी फिरत्या दवाखान्याद्वारे घरपोहोच रुग्णसेवा सुरू केली आहे. तिचे लोकार्पण सोनई येथे माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. तालुक्यातील विविध रुग्णालयांमध्ये रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. सोनई येथे माजी मंत्री शंकरराव गडाख यांना शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांची गर्दी केली होती. सकाळी ९ ते दु. १:३० वाजेपर्यंत नेवासा तालुक्यातील विविध गावांमधील विविध संस्थांचे पदाधिकारी, तरुण, ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, शेतमजूर, शेतकरी यांनी भेट देत गडाख यांना शुभेच्छा देऊन अभीष्टचिंतन केले. याप्रसंगी देवीदास महाराज म्हस्के, महंत सुनीलगिरी महाराज, महंत आवेराज महाराज, पंढरीनाथ महाराज तांदळे, रमेशानंदगिरी महाराज, ज्ञानेश्वर महाराज तांबे, के. एम. बाबा फाटके, नाम देव महाराज कोरडे, ब्रह्माकुमारी उषादीदी, आदींसह हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थित होती.

यावेळी शंकरराव गडाख म्हणाले, जिवाभावाची माणसे व कार्यकर्त्यांचे प्रेम ही माझी ऊर्जा आहे. सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी मानून सत्ता असो व नसो; जनसेवेसाठी सदैव कटिबद्ध आहे.



### हजारो नागरिकांची उपस्थिती

शंकरराव गडाख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी दिवसभर तालुक्यातील हजारो लोकांनी त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात गर्दी केली होती. आमदार आदित्य ठाकरे, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार धीरज देशमुख, आमदार कैलास पाटील यांच्यासह जिल्ह्यातील विविध पक्षांच्या नेत्यांनी, तसेच पदाधिकाऱ्यांनी शंकरराव गडाख यांना फोनद्वारे किंवा सोशल मीडियाद्वारे शुभेच्छा दिल्या.

## ग्रामपंचायत सदस्य रामदास गोंदकेंचा राजीनामा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्याच्या पठार भागा तील हिवरगाव पठार ग्रामपंचायतीचे काँग्रेसचे सदस्य रामदास भिमाजी गोंदके यांनी आपल्या ग्रामपंचायत सदस्य पदाचा राजीनामा थेट सरपंच सुप्रिया मिसाळ यांच्याकडे सादर केला आहे. या राजेनामा नाट्याने पठार भागाच्या राजकीय वर्तुळात एकाच खळबळ उडाली आहे.गोंदके हे आदिवासी बहुल असलेल्या हिवरगाव पठार ग्रामपंचायतच्या गिऱ्हेवाडी प्रभागातून निवडून आलेले म ाजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे निष्ठावान कार्यकर्ते होते. मात्र या प्रभागातील आदिवासी बांधवांच्या अडी अडचणी तसेच त्यांच्या प्रश्नांबाबत माजी मंत्री थोरात यांच्याशी चार-पाच महिन्यापूर्वी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यांनी कोणतीही दखल घेतली गेली नाही, असा आरोप गोंदके यांनी केला आहे. "जर आदिवासी समाजाचे प्रश्नच मार्गी लागणार नसतील, तर या पक्षात राहून उपयोग होणार तरी काय? असं सवाल उपस्थित करत. आदि वासी समाजाच्या अपेक्षा आणि त्याचे प्रतिबिंब दिसून येत आहे. तसेच त्यांच्या या निर्णयाम ागे केवळ व्यक्तिगत नाराजी नसून, पक्षाची नाराजी असल्याचे म्हटले जात आहे. या राजीनाम्यामुळे स्थानिक काँग्रेस कार्य कर्त्यांमध्ये नाराजी वाढू शकते आणि याचा आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांवर परिणाम होऊ शकतो, अशी ही चर्चा साकुर पठार भागात होत आहे.



# होळकर त्रिशताब्दी गौरव महोत्सवाची भव्य सुरुवात!

## डॉ. विखे पाटील आणि आमदार जगताप यांची उपस्थिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त जनसेवा फाउंडेशन व विचार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अहिल्यानगर गौरव दिन' महोत्सवाचा शुभारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि पारंपरिक वातावरणात करण्यात आला.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेची सुरुवात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आली.डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, ही शोभायात्रा दिल्लीगेट-बालिकाश्रम रोड येथून प्रारंभ होऊन प्रोफेसर चौक येथे संपन्न झाली. हजारोंच्या संख्येने जमलेल्या नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागाने ही मिरवणूक एका ऐतिहासिक सोहळ्यात रूपांतरीत झाली. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशा पथकं, विविध धर्म-जातीतील महापुरुषांच्या मूर्ती, देवदेवतांचे रथ आणि जिल्ह्यातील पारंपरिक नृत्यप्रकारांनी संपूर्ण परिसर उत्सवमय झाला होता. हा गौरव महोत्सव तीन दिवस चालणार आहे. दुसऱ्या दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार असून, तिसऱ्या दिवशी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जीवनावर आधारित एक प्रसिद्ध नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे. त्याद्वारे महोत्सवाची सांगता होईल, अशी माहिती डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.



डॉ. विखे पाटील यांनी अभिमानाने नमूद केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेतून आणि मार्गदर्शनातून हा महोत्सव अहिल्यानगरमध्ये भव्य स्वरूपात साकारण्यात आला असून, संपूर्ण महाराष्ट्रभर तो साजरा होत आहे, ही अत्यंत गौरवास्पद गोष्ट आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये म ोलाचे योगदान देणाऱ्या सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक आणि नागरिकांचे डॉ. सुजय विखे पाटील यांनी मन:पूर्वक आभार मानले.

## मोफत शिबिरांची अत्यंत आवश्यकता : डॉ.अशपाक पटेल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : देशात गरजूंची संख्या मोठी आहे. त्या प्रमाणात सामाजिक उपक्रमांची कमतरता आहे. आपल्याकडे रोज काही ना काही दिवस साजरे केले जातात. अशावेळी समाजाच्या गरजा ओळखून त्या दिवसांना ते गरजूंना गरज असलेले उपक्रम राबविले पाहिजेत, असे प्रतिपादन पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे डॉ. अशपाक पटेल यांनी केले.

पटेल स्पेशालिटी क्लिनिक व अलकरम हॉस्पिटल तर्फे अहमदनगर शहराच्या स्थापना दिनानिमित्त मोफत थॉयरॉईड, युरिक एसिड तपासणी, सर्वरोग तपासणी, डोळे तपासणी सहुलतीत रक्त लघवी तपासणी, एक्स-रे, सोनोग्राफी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. अशपाक पटेल, डॉ जहीर मुजावर, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, अल करम सोसायटीचे तौफिक तांबोली, शेरअली शेख आदी उपस्थित होते. डॉ. पटेल म्हणाले की, संपूर्ण जगात भारतच एकमेव असा देश आहे जिथे वेगवेगळ्या धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. हाच या देशाचा खरा गौरव असून, याच ओळखीने भारत अख्ख्या जगात ओळखला जातो. अशा देशात रोज काही न काही सण उत्सव साजरे करताना समाजाच्या हिताचे उपक्रम राबविल्यास गरजूंच्या गरजांना हातभार लागेल.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबीद खान यांनी केले. सुत्रसंचालन शेरअली शेख यांनी केले. तर आभार तौफिक तांबोली यांनी मांनले.



## 'संजय गांधी' योजनेचे अनुदान रखडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यात गेल्या सात महिन्यापासून संजय गांधी श्रावण बाळ योजनेचा लाभ निम्म्यापेक्षा जास्त लाभार्थ्यांना आजपावेतो मिळालेले नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.डीबीटी योजना व लाडक्या बहिणीला वळवलेला निधी यामुळे संजय गांधी श्रावणबाळ योजनेचे अनुदान थांबले गेले आहे. अनुदानाची लोक आतुरतेने वाट पाहत आहे. मात्र त्यांच्या पदरी निराशाच पडत आहे. तसेच तहसील पुरवठा खाते, ऑनलाईन रेशनकार्ड प्रक्रिया, विभक्त व नवीन रेशनकार्ड नाव वाढवणे नाव कमी करणे ही कामे लवकर होत नाही. रेशनकार्डची प्रकरणे घेताना सेतू चालक टाळाटाळ करतात. १२ अंकी नंबर देणे ऑनलाईन नावे वाढवणे ते कमी करणे, २ रु. किलोचे धान्य मिळणे ही कामे कोणाकडे करायची? असा सवाल जनता व्यक्त करीत आहेत. जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी यात लक्ष घालीत नाही, तालुक्याचे आमदार याबत तहसीलशी संपर्क करीत नाही, जनता दरबार घेत नाही.

ज्यांना महाराष्ट्र राज्याबाहेर प्रवेश घ्यायचा असेल त्यांनी सेंट्रलचा जातीचा दाखला व सेंट्रलचे नॉन क्रिमिलेयर काढून गरजेचे असते. महाराष्ट्र सोडून इतर राज्यात ११ वी किंवा १२ वी नंतर शिक्षण घ्यायचे असेल, एखादा कोर्स करायचा असेल तर तिथे आपल्या राज्यातील जातीचा दाखला चालत नाही. तेव्हा सेंट्रलचा जातीचा व सेंट्रलचे नॉन क्रिमिलेयर काढून घेणे गरजेचे आहे.

सध्या ११ वी प्रवेशामुळे गर्दी वाढत असून प्रत्येक तहसीलने दाखले देण्याची प्रक्रिया जलद करावी, अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, सह्यांचे थंबचे अधिकार अव्वल कारकून नायब तहसीलदार यांना द्यावे, सॉफ्टवेयर चा प्रश्न मार्गी लावावा, अशा मागण्या होत आहे.

# जिल्ह्यातील ७० पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना स्थगिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील ३६३ पोलिस कर्मचारी प्रशासकीय बदलीस पात्र होते. त्यापैकी ७० कर्मचाऱ्यांना जिल्हा आस्थापना मंडळाने स्थगिती दिली आहे. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करावे, अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हा पोलिस आस्थापना मंडळाची कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी बुधवारी पोलिस मुख्यालयात बैठक झाली. जिल्ह्यातील पोलिस शिपाई ते पोलिस उपनिरीक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांचा विषय मंडळासमोर होता. यंदा जिल्ह्यातील पोलिस ठाणे व विविध विभागातील एकाच जागेवर पाच वर्षे पूर्ण झालेले ३६३ कर्मचारी बदलीस पात्र होते. यापैकी २९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, ७० कर्मचाऱ्यांच्या बदल्या काही कालावधीसाठी स्थगित करण्यात आल्या आहेत. यातील बहुतांश कर्मचाऱ्यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

एका विभागातून दुसऱ्या विभागात अथवा पोलिस ठाण्यात बदली होऊनही काही कर्मचाऱ्यांना संलग्न ठेवले जाते. पोलिस खात्यात हा प्रकार गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. विशेष म्हणजे कर्मचाऱ्यांना संलग्न ठेवण्याचा कोणताही नियम नाही. असे असतानाही कर्मचाऱ्यांना संलग्न नियुक्त्या देण्यात येतात. गतवर्षी पोलिस महासंचालकांनीही याबाबत आदेश दिले होते. तरीही अनेक कर्मचारी बदली तत्काळ कार्यमुक्त न केल्यास शिस्तभंगाची कारवाई होणार होऊनही त्याच जागेवर असून, ते बदलीच्या ठिकाणी हजर झालेले नाहीत. आता नव्याने कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बहुतांश कर्मचारी बदलीच्या ठिकाणही हजरही होतात. परंतु, काही कर्मचारी एकाच जागेवर ठाण मांडून राहतात. त्यामुळे पोलिसांकडून नाराजी व्यक्ती केली जाते.



### बदलून येणाऱ्यांची प्रतीक्षा करू नका

बदली झालेल्या कर्मचाऱ्यांकडील तपासावरील गुन्हे, प्रकरणे प्रभारी अधिकाऱ्यांकडे चार्ज यादीसह जमा करून घेऊन बदलून येणाऱ्या कर्मचाऱ्यांची प्रतीक्षा न करता बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठांनी तत्काळ कार्यमुक्त करावे. तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा. याचे पालन न केल्यास अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली होईल.



# बालांगण

## टांझानियाविषयी...

सफर देशांची




टांझानिया हा पूर्व आफ्रिकेतला सर्वात मोठा देश आहे. 'डोडोमा' ही टांझानियाची राजधानी. स्वाहिली आणि इंग्रजी या इथल्या अधिकृत भाषा आहेत. 'टांझानियन शिलिंग' हे या देशातलं चलन. 'झांझीबार', 'माफिया' आणि 'पेंबा' ही इथली प्रसिद्ध बेटं. या देशाच्या एका बाजूला हिंदी महासागर आहे. केनिया, युगांडा, रवांडा, बुरुंडी, कांगो, झांबिया, मलाबी आणि मोझांबिक्यू हे टांझानियाचे शेजारी देश. 'माउंट किलिमांजारो' हे आफ्रिकेतलं सर्वात मोठं शिखर टांझानियामध्ये आहे. इतंकच नाही तर आफ्रिका खंडातले तीन सर्वात मोठे तलावही या देशात आहेत.

टांझानियामध्ये १२० जमातींचे लोक रहातात. या आफ्रिकेतल्या आदिवासी जमाती आहेत. 'सुकुमा' ही इथली सर्वात मोठी आदिवासी जमात आहे. या देशातले ९० टक्के लोक ग्रामीण भागात रहातात. बरेच लोक शेतीही करतात. पण आता इथले लोक शहरांकडे वळत आहेत. फूटबॉल आणि बॉक्सिंग हे इथले लोकप्रिय खेळ आहेत.

टांझानियामध्ये विविध प्रजातींचे प्राणी पहायला मिळतात. झेब्रा, जिराफ, हत्ती, गेंडा, सिंह, बिबट्या, हिप्पोपोटॅमस, मगरी हे प्राणी टांझानियामध्ये मुक्तपणे फिरतात. इथल्या समुद्रात मोठ्या आकाराची कासवंही आढळतात. या देशात बरीच अभयारण्य आहेत. 'सेरेंगेती' हे टांझानियातलं सर्वात मोठं आणि जुनं अभयारण्य आहे. या अभयारण्यात बरेच प्राणी पहायला मिळतात. दुसऱ्या महायुद्धानंतर या देशावर ब्रिटनने सत्ता प्रस्थापित केली. १९६४ मध्ये या देशाला स्वातंत्र्य मिळालं.

## समृद्ध नृत्यकला

जाणून घ्या

दोस्तांनो, आपल्या देशाची नृत्य परंपरा खूप समृद्ध आहे. भारतातील पाच प्रमुख शास्त्रीय नृत्यप्रकार जगभर प्रसिद्ध आहेत. आज त्याविषयी जाणून घेऊ या.

**कथक**

कथक हे उत्तर भारतातील एक शास्त्रीय नृत्य आहे. या नृत्यकलेच्या माध्यमातून कथांचे चित्रण केले जाते. कथक हा शब्द कथेपासून आला आहे. 'कथक' हा शब्द संस्कृत शब्द 'कथ' पासून आला आहे. यामध्ये नर्तक नृत्य आणि अभिनयाद्वारे पौराणिक कथा सादर करतात. कथकमध्ये, हालचाल आणि लय यावर भर दिला जातो. हे नृत्य पायांच्या हालचाली (तत्कार) आणि हस्तमुद्रा (हाताचे हावभाव) या द्वारे सादर केले जाते. या नृत्याचे पोशाख मुघल काळाच्या प्रभावाने सजवलेले आहेत.

**भरतनाट्यम**

भरतनाट्यमची उत्पत्ती तामिळनाडूमध्ये झाली. हे दक्षिण भारतातील सर्वात प्रमुख नृत्य आहे, जे देवदासी मंदिरांमध्ये सादर करत असत. भरतनाट्यमच्या नृत्यदिग्दर्शनात



आसनांना (अरिमंडी, मुद्रा) विशेष स्थान आहे. हा नृत्यप्रकार भाव (भावना), राग (संगीत) आणि ताल (लय) यांचे एक अद्वितीय मिश्रण असून ते एकमेकांना संतुलित करण्यास मदत करतात. भरतनाट्यमचा पोशाख खास आहे. या नृत्यासाठी साडी एका अनोख्या शैलीत नेसली जाते आणि दागिन्यांचा वापर केला जातो. यामध्ये माथेपट्टीला विशेष महत्त्व आहे.

**कथकली**

कथकली नृत्याचा उगम केरळमधून झाला आहे. हे एक प्रकारचे नृत्य-नाटक असून त्यात महाकाव्यांमधील (रामायण, महाभारत) कथांचे चित्रण केले जाते. या नृत्यासाठी मेक-अप आणि मुखवटे (हिरवा-लाल रंग) वापरले जातात आणि डोळ्यांवर आणि चेहऱ्यावरील हावभावांवर विशेष भर दिला जातो.

**ओडिसी**

या नृत्याची उत्पत्ती ओडिशामध्ये झाली आहे. ते भगवान जगन्नाथाच्या पूजेशी संबंधित आहे ते मंदिरांमध्येच विकसित झाले आहे. या नृत्यात त्रिभंग मुद्रेचे विशेष महत्त्व आहे. यामध्ये प्रेम आणि भक्तीच्या भावनांना अधिक महत्त्व दिले जाते.

## सहजीवनाचे सुरेख उदाहरण

वाचा तर खरं

छोट्या दोस्तांनो, कल्पना करा की, तुम्ही सकाळी डोळे चोळून टेरेसवर गेलात आणि समोर एक बिबट्या बसलेला असेल, तर पहिली प्रतिक्रिया काय असेल? भीती, घाबरणे किंवा कदाचित पळून जाणे...बरोबर ना? पण राजस्थानच्या पाली जिल्ह्यात लोक बिबट्याला घाबरत नाहीत उलट तर त्याला 'जुना शेजारी' मानतात.

हो, ही कथा नाही तर वास्तव आहे. इथे मानव आणि बिबट्यांमध्ये युद्ध नाही तर समजूतदारपणा आणि विश्वासाचे एक अनोखे नाते आहे. येथील लोक बिबट्यांना शत्रू नव्हे तर गावाचे रक्षक मानतात. या नात्यात भीतीऐवजी विश्वास असतो आणि धोक्याऐवजी सहअस्तित्व असते

राजस्थानमधील पाली जिल्ह्यातील बेरा, फालना, दंतीवाडा आणि जावई या भागात बिबटे उघड्यावर फिरतात. ते डोंगरावरील गुहांमध्ये राहतात आणि कधीकधी घरांच्या छतावरही दिसतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथील लोक घाबरुन त्यांच्यावर हल्ला करत नाहीत. उलट, बिबटे इथल्या लोकांच्या जीवनाचा एक भाग बनले आहेत. या गावांमध्ये रबारी समाजाचे लोक राहतात. बिबट्याने एखाद्याची बकरी पळवली तरी हे लोक ती 'नैसर्गिक देणगी' मानतात आणि अजिबात रागावत नाहीत.

पाली जिल्ह्यातील जावई परिसर हा विशेषतः बिबट्यांचा बालेकिल्ला मानला जातो. येथील पर्वतीय गुहा आणि शांत वातावरण या वन्य मांजरींसाठी एक आदर्श निवासस्थान आहे. एकट्या जावई परिसरात ६० हून अधिक बिबटे राहतात असे मानले जाते. त्यांच्या उपस्थितीमुळे लांडगे आणि तरस यांसारख्या भक्षकांना आळा बसतो.

स्वाभाविकच यामुळे गावातील पशुधनाला धोका निर्माण होऊ शकतो.

लाल पगडीवरून ओळखला जाणारा रबारी समुदाय भटक्या जीवनशैलीसाठी ओळखला जातो. पण ते पिढ्यानपिढ्या या भागात



स्थायिक झाले आहेत. जावई आणि बेरा सारखी गावे आता उत्साही लोकांसाठी एक आकर्षक ठिकाण बनली आहेत. अरवली पर्वतरांगांमध्ये वसलेल्या या भागात तुम्हाला बिबट्या मुक्तपणे फिरताना दिसतात.

मित्रांनो, आज आपण मानव आणि वन्यजीवांमधील संघर्षाच्या बातम्या ऐकतो. तेव्हा पाली जिल्ह्याचे हे मॉडेल सर्वांना एक धडा देते. यावरू दिसून येते की, मानवाची इच्छा असेल तर ते वन्यप्राण्यांशी सुसंवाद राखून शांततेत राहू शकतात. रबारी समाजाचे बिबट्यांशी असणारे हे अनोखे नाते केवळ एक कथा नाही तर पर्यावरणासोबत संतुलित जीवन जगण्याची प्रेरणा देखील आहे.

## आरोग्यदायी चहा घ्या

आरोग्य जपा

उन्हाळ्यात दुधाचा चहा प्यायल्याने उष्णतेचा त्रास वाढण्याची शक्यता असते. मग हा चहा टाळून अन्य कोणत्या प्रकारचा चहा उन्हाळ्यासाठी योग्य आहे, हे आज जाणून घेऊ या.

मित्रांनो, या दिवसांमध्ये तुम्ही हर्बल टी घेऊ शकता कारण यामुळे शरीराला थंडावाच मिळत नाही तर आरोग्यासाठीही हा चहा गुणकारी असतो. तुम्ही पाच प्रकारचे हर्बल टी पिऊ शकता.



**पेपरमिंट चहा:** पुदिन्याचा चहा उन्हाळ्यासाठी एक परिपूर्ण पेय आहे. हे केवळ शरीराला थंड ठेवत नाही तर पचनसंस्था देखील निरोगी ठेवते. उन्हाळ्यात हा चहा प्यायल्यास पोटातील उष्णता आणि आम्लता कमी होते. मळमळ आणि अपचनापासून आराम मिळतो. शरीराला ताजेतवाने करते आणि ऊर्जा वाढवते.

**लेमनग्रास चहा:** लेमन ग्रासमध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे उन्हाळ्यात होणाऱ्या समस्यांपासून संरक्षण करतात. याच्या सेवनाने शरीराचे तापमान नियंत्रित करते. ताण आणि थकवा दूर होतो तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**हिबिस्कस चहा:** या गडद लाल रंगाच्या चहामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. त्यामुळेच हा चहा पिल्याने उन्हाळ्यातही शरीर हायड्रेटेड राहते. हा चहा रक्तदाब नियंत्रित करतो, शरीरातील उष्णता कमी करतो तसेच वजन कमी करण्याही तो उपयुक्त ठरतो. तुळशीचा चहा: मित्रांनो तुम्ही उन्हाळ्यात तुळशीचा चहाही घेऊ शकता. याने केवळ उष्णतेपासून आराम मिळत नाही तर संसर्गापासून देखील संरक्षण मिळते. श्वसनाचे आरोग्य राखणे, ताण कमी होणे, चयापचय सुधारणे हे याचे लाभ आहेत. कॅमोमाइल चहा: हा चहा मज्जासंस्था शांत करतो आणि चांगली झोप येण्यास मदत होते. ताण दूर करते, त्वचेसाठी फायदेशीर तसेच पोटाची जळजळ शांत होणे हे याचे अन्य लाभ आहेत. तेव्हा चहाचे अनेक आरोग्यदायी प्रकार आईच्या मदतीने करा आणि आस्वाद घेत आरोग्यही राखा.

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) गोंडवाना कोळशाच्या खाणी कुठल्या राज्यात आहेत?
२) भारतातल्या किती राज्यांच्या सीमा म्यानमारशी जोडलेल्या आहेत?
३) अबोहार अभयारण्य कोणत्या राज्यात आहे?
४) लक्ष्यद्विपची राजधानी कोणती?
५) २०२४ अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीचा विजेता कोण?
६) इजिप्तची राजधानी कोणती?
७) कोलंबिया या देशाची राजधानी कोणती?
८) हवाना ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
९) जंक ई-मेलचं दुसरं नाव काय?
१०) कॉम्प्युटरमधला बग किंवा व्हायरस शोधण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात?

उत्तर : १) मध्य प्रदेश २) चार ३) पंजाब ४) कावरत्ती ५) जेनिक सिनर ६) कैरो ७) बोगोटा ८) क्युबा ९) स्पॅम १०)डिबगिंग

## अनोखे घड्याळ

टेक फन

छोट्या दोस्तांनो, या स्मार्ट जगात सगळे काही स्मार्ट आहे. हातातल्या घड्याळाचा वापर आता फोन करण्यासाठी करता येतो आहे. इतकेच नाही तर हृदयाचे ठोके, किती चालणे झाले, शरीराचे तापमान काय, बीपी किती आहे असे सगळे जाणून घेण्यासाठी घड्याळाचा वापर वाढला आहे. अशातच 'सॅमसंग'च्या घड्याळाच्या साह्याने तुम्हाला फोनही करता येतो. 'गॅलेक्सी वॉच ॲक्टिव्ह २' असं या घड्याळाचं नाव आहे. यात 'बेजल कंट्रोल', 'ऑटोमॅटिक ॲक्टिव्हिटी ट्रॅकिंग', 'व्हॉईस कॉलिंग सपोर्ट', 'सिंपल स्पॉटिफाय इंटिग्रेशन' अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. हे घड्याळ दोन प्रकार आणि आकारात सादर




करण्यात आलं आहे. हे घड्याळ तयार करण्यासाठी ॲल्युमिनियम आणि स्टेनलेस स्टीलचा वापर करण्यात आला आहे.

यात १.५ जीबी रॅम आणि ४ जीबी इंटरनल स्टोरेज आहे. यात हार्ट रेट सेन्सर, ईसीजी सेन्सर, एक्लेरोमीटर, गायरोस्कोप, बॅरोमीटर आणि ॲंबियंट लाईट सेन्सर देण्यात आले आहेत. त्यात ब्लूटूथ ५.० आहे. यामुळे हे घड्याळ स्मार्टफोनशी कनेक्ट करून व्हॉईस कॉलिंग करता येईल. यात ३४० एमएएचची बॅटरी बसवण्यात आली आहे. यात वायरलेस चार्जिंगचीही सोय आहे. हे घड्याळ युजरच्या शारीरिक हालचालीवरही लक्ष ठेवेल.

## ठिपके जुळवा



## असं आहे आपलं काश्मीर

भटकंती



काश्मीरमध्ये अलिकडील घटना तुम्हालाही हादरवून गेली असेल. तुम्ही सगळ्या बातम्या ऐकल्या, वाचल्या असतील. पण मित्रांनो, काश्मीर हा केवळ एका जमिनीचा तुकडा नाही तर इतिहास, लोककथा आणि संस्कृतीच्या धरांनी वेढलेले हे एक नाव आहे, हे कायम स्मरणात ठेवा. एकेकाळी 'पृथ्वीवरील स्वर्ग' म्हणून ओळखले जाणारे हे क्षेत्र आज दहशतवादाने होरपळले असले तरी ते सौंदर्यासाठी जगभर ओळखले जाते.

छोट्या मित्रांनो, काश्मीर हा शब्द एका जुन्या लोककथेत सापडते. ही दरी एका विशाल तलाव कोरडा पडल्याने अस्तित्वात आली. हजारो वर्षांपूर्वी लोककथा सांगते की, काश्मीर एकेकाळी एक मोठे सरोवर होते. इथे कोणीही मानव राहत नव्हता. फक्त पाणी होते. त्यानंतर महर्षी कश्यप आले. त्यांनी बारामुल्लाच्या टेकड्या तोडल्या आणि सरोवराचे पाणी काढून टाकले. त्यामुळे मानवी वस्तीसाठी योग्य जमीन निर्माण झाली. ती इतकी सुंदर होती की पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून ओळखली जाऊ लागली. ही भूमी नंतर कश्यपमार आणि नंतर काश्मीर बनली.

१२ व्या शतकातील इतिहासकार कल्हण यांच्या 'राजतरंगिणी' या पुस्तकातही या सरोवराची आणि ऋषी कश्यपची कहाणी आहे. जम्मू आणि काश्मीर सरकारच्या नियोजन विकास आणि देखरेख विभागाच्या वेबसाइटवरही याचा उल्लेख आहे. संस्कृतमध्ये क म्हणजे जल (पाणी) आणि शमीरा म्हणजे कोरडे करणे. यानुसार, 'काश्मीर' म्हणजे सुकलेले पाणी म्हणजेच पाण्यातून बाहेर आलेली जमीन. ५५० मध्ये ग्रीक इतिहासकार हेकाटियस यांनी या प्रदेशाचा उल्लेख 'कास्पापायरोस' असा केला आहे.




### दोस्त हे मस्त

#### चकाकणारे प्राणी

'टोमोप्टेरिस' हा समुद्री जीव आहे. हा सजीव पूर्णपणे पारदर्शक आहे. टोमोप्टेरिसचं अंग चमकतं. यामुळे त्यांचा शत्रूपासून बचाव होतो. शत्रू जवळ आल्यावर टोमोप्टेरिसचं शरीर चमकू लागतं.



यामुळे शत्रूंचा गोंधळ उडतो. टोमोप्टेरिस समुद्रात अगदी खोलवर आढळतो. समुद्राच्या तळाशी आढळणाऱ्या बऱ्याच सजीवांचं शरीर चमकतं. हे या प्राण्यांचं अनोखं वैशिष्ट्य म्हणावं लागेल.

### खादाडी

#### मस्त कर्ड सँडविच



मुलांनो संध्याकाळी पोटभरीचं खाणं म्हणून सँडविचला पसंती मिळते. भाज्या घातलेलं सँडविच तुम्ही नेहमीच खाता. वेगळ्या चवीसाठी तुम्ही दही सँडविच बनवू शकता. यासाठी चार ब्रेड स्लाईस घ्या. पाऊण कप घट्ट दही, मीठ, किसलेलं गाजर अर्धा कप, पाव चमचा मिरपूड, रेड चिली फ्लेक्स, थोडी कोथिंबिर, दोन चमचे बटर आणि एक चमचा ऑलिव्ह ऑईल असं साहित्य घ्या. तव्यावर थोडं बटर घालून ब्रेड भाजून घ्या. दह्यातलं पाणी काढून टाकायला हवं. यासाठी दही एका कपड्यात गुंडाळून ते पिळून घ्या. आता हे दही एका भांड्यात काढून त्यात गाजर, कोथिंबिर, चिली फ्लेक्स, मिरपूड, मीठ घाला. हे मिश्रण एका ब्रेड स्लाईसवर पसरून घ्या. त्यावर दुसरा स्लाईस ठेवा. तुमचं सँडविच तयार आहे.

### स्टडी टिप्स

#### घ्या स्वत:ची परीक्षा

छोट्यांनो, चांगला अभ्यास करण्यासाठी आपण स्वत:चीच चाचणी घ्यायला हवी. तेव्हा सुट्टीचा वेळ यासाठीही वापरा. कधी शाळेत अचानक परीक्षा घेतली जाते. सरप्राईज



टेस्ट असते. यामुळे तुम्हाला अभ्यासाची तयारी करून ठेवावी लागते. अशाच प्रकारे आपणही अधूनमधून स्वत:ची चाचणी घ्यायला हवी. तुम्ही वर्षभर अभ्यास करता. सुट्टीतही ही सवय सोडू नका. या काळात पेपर सोडवा. यामुळे आपला किती अभ्यास झालाय याचा अंदाज तुम्हाला येईल.

### योगा टाईम

#### सुखाने करा सुखासन

मुलांनो, बुद्धी तल्लख करण्यासाठी, एकाग्रता वाढवण्यासाठी तुम्ही सुखासन करू शकता. या



आसनामुळे शरीर आणि मन ताजंतवानं होतं. नावाप्रमाणेच हे अगदी सोपं आसन आहे. सुखासन करण्यासाठी मांडी घालून बसा. पाठीचा कणा ताठ ठेवा. दीर्घ श्वास घ्या. हे आसन दररोज पाच मिनिटं करा.